# आजचा सुधारक

विवेकवादी चिंतनाला वाहिलेली ग्रंथमाला




## युद्ध म्हणजे सर्वनाश !

# या अंकात


| | | |
|---|---|---|
| 1. पुनर्भेट : समान नागरी कायदा : स्त्रीमुक्तीच्या अंगाने चिकित्सा | दिवाकर पुरुषोत्तम मोहनी | 3-13 |
| 3. भारतीय चर्चापद्धती : 3 – अन्वीक्षिका | श्रीनिवास हेमाडे | 13-20 |
| 4. मराठा मोर्चे: एक आकलन | विलास सोनवणे | 21-27 |
| 5. सुफी-भक्ती: एक समन्वय | नाजीर पठाण | 28-34 |
| 6. पुस्तक परिचय: द सर्कल | प्रियांका ठुबे | 35-37 |
| 7. अनुभव : मी मराठा ? | प्रियांका तुपे | 38-40 |
| 8. चित्रपट परीक्षण : पिंक | समीक्षा फराकटे | 41-46 |
| 9. प्रतिसाद : | शरद काळे | 47 |
| 10. कविता : | | 48 |


**मुखपृष्ठावरील चित्र : आंतरजालावरून**


संस्थापक संपादक
**दि. य. देशपांडे**

संपादक
**रवीन्द्र रुक्मिणी पंढरीनाथ**

प्रकाशन – 3 नोव्हेंबर 2016
प्रकाशकः भरत मोहनी, श्रीमोहिनीराज, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर 440010.
मुद्रकः नितीन तापस, श्याम ब्रदर्स, एस.टी.स्टँड रोड, नागपूर-18.
किरकोळ प्रत – रु.30 फक्त



**संपर्कः**
रवीन्द्र रुक्मिणी पंढरीनाथ — ravindrarp@gmail.com
editor.sudharak@gmail.com
भरत मोहनी — bharat_i@yahoo.com (9822736808



ही ग्रंथमाला संक्षिप्त स्वरूपात www.aajachasudharak.in वर प्रकाशित होते, संपूर्ण ग्रंथमाला मुद्रित पुस्तकाच्या स्वरूपात हवी असल्यास वर्षभरासाठी रु.300 व्यक्तीसाठी आणि रु.350 संस्थेसाठी पाठवून सभासद व्हावे. सभासद शुल्क मनीआर्डर अथवा पेयेबल अट पार चेक ने आजचा सुधारक, 201, श्रीमोहिनीराज, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर-440010. येथे पाठवावे.

# समान नागरी कायद्याचा मसुदा : एक चिकित्सा – स्त्रीमुक्तीच्या अंगाने

*दिवाकर पुरुषोत्तम मोहनी*

*समान नागरी कायदा, स्त्रीमुक्ती*

---

समान नागरी कायद्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे व त्या निमित्ताने नव्या तिकिटावर जुना खेळ सुरू झाला आहे. ह्या पार्श्वभूमीवर ह्या संदर्भातील महत्वाचे मुद्दे रेखांकित करणारा 'आजचा सुधारक'च्या जानेवारी व फेब्रुवारी १९९७च्या अंकात प्रकशित झालेला हा लेख आम्ही मुद्दाम पुनर्मुद्रित करीत आहोत.

---

स्त्रीमुक्तीच्या आंदोलनाची उद्दिष्टे दोन आहेत. स्त्रीपुरुषांच्या सामाजिक दर्जामध्ये समानता आणणे व त्याचबरोबर सर्व स्त्रियांच्या एकमेकींच्या दर्जामध्ये समानता आणणे. सधवा/ विधवा, पतिव्रता/ व्यभिचारिणी ह्यांमध्ये आज जो फरक केला जातो तो आपल्या समाजाच्या पुरुषप्रधान विचारसरणीमुळे आणि स्त्रियांच्या पुरुषसापेक्ष स्थानामुळे होतो. त्यामुळे एकूणच स्त्रियांचे स्वातंत्र्य अत्यंत संकुचित होते, किंबहुना नष्टच होते हे आपण लक्षात घेत नाही. आपण सगळे विचारांमध्ये इतके गतानुगतिक आहोत, इतके पूर्वसंस्काराभिमानी आहोत, की स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा संकोच कशामुळे होतो, त्यांना blackmail करण्याचे साधन आपण (म्हणजे त्यांत स्त्रियासुद्धा आल्या) कसे सांभाळून ठेवतो, त्याला धक्का लागू देत नाही, हे आपल्या कोणाच्या लक्षातसुद्धा येत नाही.

आपल्या संस्कृतीने विवाहाला पवित्र संस्कार मानले आहे, sacrament मानले आहे असे आपणास सांगण्यात येते. विवाहबंधन कधीच मोडावयाचे नाही. अन्य पुरुषाचा विचारसुद्धा स्त्रीने मनात आणावयाचा नाही. वैधव्यानंतरही नाही, कारण ह्या गाठी देवानेच घालून दिल्या आहेत; आणि जन्मोजन्मी तोच पती मिळावा ही कामना करणे आणि त्यासाठी काम्यव्रते करणे हे आर्य पतिव्रतेचे कर्तव्य मानले गेले आहे. ही काम्यव्रते न आचरणारी स्त्री पापी मानली जाते.

आपण वधूवरांचे टिपण जुळवितो, त्यांच्या ३६ गुणांचा मेळ बसतो की नाही हे पाहतो, तेव्हा पूर्वजन्मी तेच पतिपत्नी होते की नाही ह्याचाच पडताळा घेत असतो की काय असा विचार मनात आल्यावाचून राहत नाही. पण ते असो.

गेल्या शतकातील विधवांच्या पुनर्विवाहाला मान्यता देणाऱ्या आणि ह्या शतकातील घटस्फोटाला मान्यता देणाऱ्या कायद्यांमुळे विवाह हा पूर्वीसारखा संस्कार राहिला नाही. तो आता करारच झाला आहे; कारण त्यामुळे स्त्रीचा एकानंतर दुसरा पती करण्याचा अधिकार मान्य केला गेला आहे. पहिल्या कायद्यामुळे जन्मोजन्मी एकाच पतीचा विचार करण्याचे तिच्यावरचे बंधन नष्ट झाले आहे; आणि दुसऱ्या कायद्यामुळे एकाच जन्मात दुसऱ्या पतीचा विचार करण्यासाठी ती मोकळी झाली आहे. हे सारे जरी खरे असले तरी त्यामुळे विवाहविधी हा आता करारच झाला आहे ह्याचे भान आपल्या भारतीय समाजाला पुरेसे आलेले नाही. तो संस्कारच आहे असे तो समजून चालला आहे व तीच समजूत स्त्रीमुक्तीच्या मार्गामधील एक धोंड आहे.

समान नागरी कायद्याचा मसुदा करताना विवाहाच्या ह्या नवीन स्वरूपाची व स्त्रीमुक्तीच्या विचारांची जाण पुरेशी ठेवली गेली आहे की नाही हे आता पाहावयाचे आहे त्यासाठी मसुद्यातील तरतुदी पाहू.

**मसुद्यातील प्रमुख तरतुदी अश्या:**

१. भिन्नलिंगी व्यक्तींमध्येच विवाह शक्य.

२. एकपतिक त्याचप्रमाणे एकपत्नीक विवाहालाच मान्यता.

३. वधूवरांपैकी कोणीही वेडसर असू नये.

४. वयोमर्यादा मुलींसाठी अठरा व मुलांसाठी एकवीस आवश्यक. बालविवाह अवैध ठरवून घेण्याचे स्वातंत्र्य.

५. विवाहासाठी वर्ज्य किंवा निषिद्ध नाती कोणती ते ठरविताना रूढीला मान्यता.

६. विवाह नोंदला गेल्यासच वैध.

७. घटस्फोटाला सशर्त मान्यता.

आता वरील तरतुदींचा क्रमशः परामर्श घेऊ.

१. विवाह भिन्नलिंगी व्यक्तींमध्येच व्हावा अशी जी तरतूद आहे ती ठेवताना मसुदा करणाऱ्यांच्या डोळ्यांपुढे विवाहकायदा आणि वारसाकायदा असे दोनही कायदे एकदमच आहेत असे जाणवते. विवाहसंस्कार हा प्रत्येक स्त्रीच्या ठिकाणी तिच्या पतीची औरस संतती निर्माण करण्यासाठीच होणार असे, त्याचप्रमाणे भविष्यकालीन सर्व कुटुंबे पतिपत्नींचे एकच जोडपे आणि त्यांची मुले ह्यांचेच राहणार असे मसुदाकर्ते गृहीत धरून चालले आहेत. पण ह्या विषयाचा अधिक विस्तार करण्यापूर्वी विवाह हा आता पवित्र संस्कार म्हणून शिल्लक राहिला आहे की तो करार झाला आहे ते पुन्हा तपासून पाहू.

विवाह हा विधी जर आपल्या संततीला औरसपणा प्रदान करण्यासाठी करावयाचा नसेल (उदा. उतारवयात मूल होण्याची शक्यता नसताना केलेला विवाह) किंवा असे म्हणू की भविष्यकाळी संततीच्या औरसपणाचा आग्रह धरावयाचा नसेल तर त्या विवाहाचे स्वरूप कसे राहील? तो एकमेकांबरोबर पुढचे सर्व आयुष्य घालविण्यासाठी, पतिपत्नींपैकी कोणाचीही एकाची अडचण ही दुसऱ्याचीही तितकीच महत्त्वाची अडचण असेल अशा पद्धतीने एकमेकांशी आपले आयुष्य बांधून घेण्याच्या हेतूने, विवाहितांची जी संपत्ती असेल तिचा एकत्र उपभोग घेण्यासाठी होत असतो. त्याचे हे स्वरूप कराराचे असते. ते स्वरूप ज्या दांपत्याला अपत्य नाही अथवा ज्यांच्या जवळ पुढच्या पिढीकडे हस्तांतरित करण्यासाठी संपत्तीच नाही अशांच्या विवाहावरून स्पष्ट होते. येवढेच नव्हे तर आपले आयुष्य काही कारणामुळे एकमेकांशी बांधून घेणे ज्यांना शक्य नाही त्यांना दिलेल्या विवाहविच्छेदाच्या अधिकारावरून ते कराराचे स्वरूप अधिक स्पष्ट होते.

आता प्रश्न असा निर्माण होतो की विवाह हा जर करार आहे, त्याला साक्षी राहणार आहेत, त्याची कागदोपत्री नोंद राहणार आहे, तो अज्ञानपणी करावयाचा नाही, म्हणजे त्याला वयाची अट आहे म्हणजे सगळे जाणूनबुजून, समजूनउमजून करावयाचे आहे तर असा करार दोघांपेक्षा अधिक भिन्नलिंगी व्यक्तींनी तसेच समलिंगींनी एकमेकांशी करण्याला समाजाने हरकत का घ्यावी? एकमेकांशी आपली आयुष्ये बांधून घेण्याची व त्यासोबत येणाऱ्या अटी पाळण्याची, जबाबदाऱ्या स्वीकारण्याची ज्यांची तयारी असेल,

विवाहसंस्काराच्या सोबत असलेल्या पापपुण्याचा संदर्भ ज्यांच्या मनातून नष्ट झाला असेल त्यांना तशा तऱ्हेचा विवाह करून नवे नाते जोडण्याची मुभा का असू नये?

सध्याचा खाजगी मालकीवर आणि संततीच्या औरसपणावर असलेला भर उद्याच्या समाजामध्ये कमी व्हावा असे वाटत असेल तर त्यासाठी आवश्यक तो पाया मसुद्यात घालून ठेवावयाला हवा. त्यासाठी समलिंगी व अनेक स्त्रीपुरुषांमधील संभाव्य विवाहाचा उल्लेख मसुद्यात अवश्य हवा. मसुद्याचा आराखडा सर्वमान्य होईल असा पहिल्यापासून असला तर त्यावर पुरेशी चर्चा कधीच होणार नाही. मसुदा भविष्यकाळी चर्चेला आल्यानंतर समलिंगी व्यक्तींचा विवाह का नको व तो एकपतिपत्नीकच का असावा त्याची कारणे ती तरतूद नाकारताना द्यावी लागतील.

बहुपत्नीक विवाहामध्ये स्त्रीवर अन्याय होतो असे लक्षात आल्यामुळे एकपत्नीक विवाहाचे कायदे करण्यात आले, परंतु असे कायदे झाल्यामुळे स्त्रियांवरचा अन्याय कमी झाला आहे असे दिसत नाही. तरी स्त्रियांवरचा अन्याय दूर करण्यासाठी आणखी खोलात जाऊन ह्या समस्येचा अभ्यास करावा लागेल. एकपतिक विवाह म्हणजे औरस संततीचा आग्रह. वारसासाठी जी संपत्ती उपलब्ध होणार ती पुरुषांकडून होणार. ती उभय मातापितरांकडून वा एकट्या मातेकडून होणार नाही असे औरसपणाचा आग्रह धरण्यामागचे गृहीतकृत्य आहे. स्त्रीमुक्तीच्या संदर्भात ते मान्य होण्यासारखे नाही. औरस अपत्याचा पुरुषाचा आग्रह म्हणजे एकपतिकत्वाचा आग्रह. तो स्त्रियांनी चालू द्यावयाचा म्हणजे आयुष्यभर एका  पुरुषाची त्यांच्या देहावरची मालकी मान्य केल्यासारखे होते म्हणून स्त्रीमुक्तीच्या दिशेने एक पाऊल पुढे पडल्याचे समाधान आजच्या मसुद्यात नाही.

श्री. सत्यरंजन साठे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती जया सागडे आणि श्रीमती वैजयन्ती जोशी ह्यांच्या चमूने जो नवीन, भारतातील सर्व नागरिकांसाठी समान, असा विवाहविषयक कायदा सुचविला आहे त्यामुळे विवाह एक अत्यन्त गंभीर असा विधी होण्याला, त्याचे ऐहिक स्वरूप स्पष्ट होण्याला; त्याचप्रमाणे त्याचे पावित्र्य आणि मांगल्यसूचक पारलौकिकाशी आजवर असलेले नाते

संपुष्टात यावयाला मदत होईल ही अतिशय स्वागतार्ह बाब आहे हे मान्य करून त्याविषयीची चर्चा पुढे चालू ठेवू या.

२. एकपतिपत्नीक विवाहालाच मान्यता देण्याच्या तरतुदीमध्ये असा विवाह सहसा कोणाला मोडू द्यावयाचा नाही हा विचार प्रामुख्याने कार्य करताना दिसतो. त्याचप्रमाणे अनेकपत्नीक विवाहामुळे काही स्त्रियांवर अन्याय होतो त्याचे परिमार्जन करण्याची इच्छा व्यक्त होते. विवाह टिकू नयेत असे कोणालाच वाटत नाही. पण ते कसे टिकावे तर पतिपत्नींच्या परस्परांवरील सतत वृद्धिंगत होत जाणाऱ्या प्रेमामुळे; आणि आपल्यासाठी दुसरी व्यक्ती झीज सोसत आहे असे पाहून परस्परांना एकमेकांविषयी वाटणाऱ्या आदरभावामुळे. तशी परिस्थिती नसेल तर विवाह मोडण्याचे स्वातंत्र्य उभयतांना असावे. कोणाच्याही मनात प्रीतिभावनेचा लवलेश शिल्लक नसताना, देवाने गाठी घालून दिल्या आहेत, त्या आपण कश्या मोडावयाच्या असा, किंवा दुसऱ्याचा विचार मनात आणल्यास आपल्याला पाप लागेल असा विचार करून आणि त्यासाठी बायकांनी सतत पड खाऊन  विवाहबंधन कसेबसे टिकवून धरावयाचे अशी आजच्या बहुसंख्य विवाहांची स्थिती असल्याचे आम्ही वाचतो.

ज्याच्याशी यदृच्छेने आपली गाठ पडली अशा जोडीदाराच्या बाहेर कोणाशीतरी आपली मने जोडली जाण्याचा संभव नेहमीच असतो. ही भावना जर प्रत्येकाच्या ठिकाणी असेल व नैसर्गिक असेल तर तिला कृत्रिमपणे आवरण्यात समाजहित आहे असे का मानले जाते? सुसंस्कृत म्हणविणाऱ्या समाजातला सगळा दंभ, सगळा ढोंगीपणा ह्या समजुतीतून उगम पावला आहे इतकेच नाही तर त्याने अपरिमित दुःखाला जन्म दिला आहे हे उमजण्याचा काळ आता आला आहे.

अनेकपत्नीक विवाह हा सध्याच्या परिस्थितीत अनेक स्त्रिया एका पुरुषाशी जखडून पडल्यामुळे त्यांपैकी काहींना अन्यायकारक होतो; तसाच एकच स्त्री एखाद्या पुरुषाशी जखडून पडली तरी तो अन्यायकारक होतो. विवाहबंधन शिथिल झाले तर आणि दुसऱ्या पुरुषांच्या अपत्यांना आपल्या मुलांसारखे वागवायला पुरुष शिकले तरच स्त्रियांवरचा अन्याय कमी होईल. (घटस्फोटाच्या कायद्यामुळे ह्या कार्याला जेमतेम सुरुवात झाली आहे.) म्हणून पुरुषांच्या ह्या

बाबतीतल्या प्रबोधनाला आम्ही आता अग्रक्रम दिला पाहिजे. आजचा एकपतिपत्नीत्वाचा कायदा कायम ठेवल्याने पुरुषांचे प्रबोधन होणार नाही. त्यांच्याबाबतीत जैसे थे हीच परिस्थिति कायम राहील.

३. समान नागरी कायद्यातील - नव्हे त्याच्या प्रस्तावित मसुद्यातील - वेडसर व्यक्तींना वैवाहिक आयुष्यापासून वंचित ठेवण्याची तरतूद आमच्या मते अतिशय विवादास्पद आहे.

विवाहाचे म्हणजे एकमेकांशी आपले अवघे आयुष्य बांधून घेण्याच्या कराराचे गांभीर्य वेडसर असलेल्या व्यक्तींना कळू शकत नाही आणि त्या कारणास्तव असा करार करण्यासाठी त्या व्यक्ती अपात्र ठरतात हे आम्हाला मान्य आहे. तरीपण त्यामुळे त्यांना समाजमान्य असा विवाहान्तर्गत कामोपशान्तीचा हक्क नाकारला जातो हे आपण लक्षात घेतलेच पाहिजे. कामप्रेरणा ही आपल्या सहजप्रेरणांपैकी एक अत्यन्त महत्त्वाची प्रेरणा आहे. वेडसर आणि/अथवा मतिमंद लोकांच्या त्या प्रेरणेकडे पूर्ण डोळेझाक करून आपण समाजस्वास्थ्य कसे काय सांभाळू शकू ते समजत नाही.

दुसरी गोष्ट अशी की वेडसर आणि मतिमंद अथवा विकृतमनस्क ह्यांच्यामधली सीमारेषा फार पुसट असते. शिवाय मनोविकृती ही नेहमी समाजघातकच असते असे नाही, तसेच त्या विकृतीमुळे त्यांच्यामध्ये निर्बुद्धता येते असेही नाही. पण त्यांच्यातील कमतरतेमुळे आजच्या समाजव्यवस्थेत तेच बहुधा लैंगिक शोषणाचे बळी ठरतात हे आम्हाला माहीत झाले आहे. आज आमच्या समाजामधली शारीरिक किंवा मानसिक अपंगत्व असलेल्यांची संख्या फार मोठी आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात आपले आयुर्मान वाढत चालले असल्यामुळे पूर्वीपेक्षा त्यांची संख्याच नव्हे तर टक्केवारी आणखी काही दिवस वाढत जाणार आहे, कारण त्यांचेही आयुर्मान निःसंशय वाढत चालले आहे.

अशा, मुख्यतः मानसिकदृष्ट्या अपंग असलेल्या स्त्रीपुरुषांना पुष्कळ क्षमता असतात. त्यांनाही प्रेमाची गरज असते. प्रेमाच्या अभावी त्यांचा कोंडमारा झाल्यामुळे ते क्वचित आक्रमक होऊ शकतात, हे सारे आता माहीत झाले आहे. अशांपैकी बहुसंख्य स्वतंत्रपणे घर चालविण्याच्या क्षमतेचे नसणार हे स्वाभाविक आहे.

हिंदुत्वाच्या अभिमानामुळे हिंदूंच्या बाहेरच्या लोकांच्या कल्याणाची जबाबदारी आमची राहत नाही. ते आमचे कोणीच नाहीत असे आम्हाला मानता येते. तसेच आपापल्या कुटुंबाच्या अभिमानामुळे आपल्या कुटुंबापुरतेच पाहण्याची सवय आम्ही आमच्या मनांना लावतो. जोपर्यंत आमची कुटुंबे मोठी होती, संयुक्त होती, क्वचित अनेकपत्नीक वा काही प्रदेशांत अनेकपतिक होती, तोपर्यंत त्यांत सर्वांची सोय कशीबशी होऊन जात होती. पण आता तरुण आईबाप आणि त्यांची लहान मुले इतक्यांचेच जर कुटुंब राहणार असेल तर वृद्धांची रवानगी आश्रमात होणारच! वृद्धांप्रमाणे मतिमंदांचाही वाली घराघरात आता कोणीच राहणार नाही हे उघड होत चालले आहे. निष्प्रेम अशा भाडोत्री संस्थांमध्ये लाजेकाजेस्तव त्यांना जगविण्यात येईल. किंवा आज जसे त्यांचे लैंगिक शोषण होते तसेच पुढेही होत राहील. आईबाप असेतोवर घर. पुढे त्यांचे कोणीच नाही अशी स्थिति जर होऊ द्यावयाची नसेल तर घरे मोठी असल्याशिवाय, एकापेक्षा अधिक जोडपी एका घरात राहिल्याशिवाय त्यांचा प्रश्न समाधानकारकपणे सुटू शकणार नाही. तसे करावयाचे नसेल तर अशा सर्व स्त्रीपुरुषांना ते वयात येण्याच्या सुमारास खच्ची करून कोठल्यातरी संस्थेत कायमचे डांबून टाकावे लागेल. माझ्या अंगावर तर त्याच्या कल्पनेनेच काटा उभा राहतो. आजपर्यंत आम्ही आपापल्यापुरते पाहत होतो. परकीय राज्यकर्त्यांवर सर्वांच्या कल्याणाचा विचार करण्याची जबाबदारीच नव्हती. त्यांनी घालून दिलेल्या वाटेने आम्ही आंधळेपणाने जाणार, की सर्वांना - म्हणजे आपल्यांतल्या दीनदुबळ्यांनाही - आपल्यात सामावून घेऊन सांभाळून घेणारे कल्याणकारी राज्य आम्ही निर्माण करणार हा प्रश्न आहे. त्यासाठी फार मोठ्या जागरणाची गरज आहे. समान नागरी कायद्याच्या मसुद्यावरील चर्चेमुळे ह्या जनजागरणाला प्रारंभ होईल अशी आम्ही केलेली आशा ही तरतूदच त्यात नसल्यामुळे फोल ठरली आहे.

आज आपल्या देशात कमीतकमी चार टक्के लोक शारीरिक वा मानसिक दृष्ट्या अपंग आहेत. म्हणजे त्यांची संख्या तीन कोटींच्या वर आहे. मुंबई आणि कलकत्ता ह्या दोन शहरांची मिळून जेवढी लोकसंख्या आहे तेवढी तरी त्यांची संख्या आहेच. नवीन कायदा - आणि जो सर्वांना समानपणे लागू होईल असा

कायदा - करणाऱ्यांनी त्यांच्या गरजांकडे दुर्लक्ष करू नये अशी आमची त्यांना नम्र विनंती आहे. एवढ्याचसाठी एकापेक्षा अधिक स्त्रीपुरुषांचा विवाह कायदेशीर मानला जावा आणि मतिमंदांच्या अथवा वेडसरांच्या वतीने त्यांच्या पालनकर्त्यांना विवाहाचा करार करता यावा अशी तरतूद नवीन कायद्यामध्ये असावी - निदान त्याच्या मसुद्यात तरी असावी - अशी आमची शिफारस आहे.

ह्याच ठिकाणी आणखी एक मुद्दा मांडल्यास तो अनाठायी होणार नाही. आपल्या देशातील स्त्रीपुरुषांचे गुणोत्तर विषम आहे. १९९१ च्या जनगणनेप्रमाणे पुरुष १००० तर स्त्रिया ९२७ आहेत. इतकेच नव्हे तर ते गुणोत्तर आणखी बिघडण्याची शक्यता आहे. स्त्रीपुरुषांचे गुणोत्तर १:१ आहे असे धरून चालून केलेले कायदे १००० तल्या ७३ पुरुषांना वैध कामोपशांतीपासून वंचित ठेवतील. तरी असा पुरुषांना अन्यायकारक होऊ शकणारा कायदा असू नये हीच आमची अपेक्षा आहे. आता संगणक उपलब्ध झालेले असल्यामुळे पूर्वी ज्या जनगणनाविषयक आकडेमोडीला काही वर्षे लागत ती काही तासांत आटोपणे शक्य आहे. म्हणून आपल्या देशातल्या स्त्रीपुरुषांचे गुणोत्तर निश्चित करणे ही बाब पूर्वीसारखी अवघड राहिली नाही. त्यामुळे ज्यावेळी ही सोय उपलब्ध नव्हती तेव्हाचे अनुमानधपक्याने केलेले नियम वा कायदे आता लागू करू नयेत. आता नवीन, सर्वांना लागू होणारे कायदे करताना भारताच्या प्रत्येक नागरिकाचा विवाहान्तर्गत कामोपशान्तीचा अधिकार कायद्याने मान्य होईल असे पाहावे लागेल, आणि तेवढ्यासाठी आम्हाला प्रत्येक स्त्रीपुरुषाला बहुपति-पत्नीकत्वाचा अधिकार द्यावाच लागेल. आम्हाला एकपतिपत्नीक कुटुंबेच नकोत असे नाही, पण एकपतिक वा एकपत्नीक राहावयाचे की बहुपति/पत्नीक राहावयाचे हे ठरविण्याचा अधिकार प्रत्येक सज्ञान स्त्री-पुरुषास असणे आवश्यक आहे. बौद्धिक दृष्टीने अक्षम अशांतर्फे त्यांच्या पालकांना, आपल्या पाल्याचे हित लक्षात घेऊन तो वापरण्याचा अधिकार असला पाहिजे अशी आमची सूचना आहे.

४. ह्यानंतरची तरतूद विवाहयोग्य वयासंबंधीची आहे आणि तीदेखील विवादास्पद आहे. कारण विवाह हा एक करार आहे हे एकदा स्पष्ट झाल्यानंतर करार करण्याचे स्वातंत्र्य ज्या वयात आले असी समजण्यात येते, आपले बरे वाईट समजण्याची पात्रता येते, त्याच वयात विवाहाचा करार करण्याचे

स्वातंत्र्यसुद्धा प्रत्येक व्यक्तीला प्राप्त झाले पाहिजे. विवाहासाठी पुरुषाला २१ वर्षे पूर्ण करावयास सांगण्यामागे कोणता विचार केला गेला आहे ते आम्हाला समजत नाही. दोन कारणांची कल्पना करता येते. एक आर्थिक आणि दुसरे प्रजोत्पादनविषयक. येथेही हा कायदा जंगलातील आदिवासींपासून सगळ्यांना समानपणे लागू होणार ह्याकडे मसुदाकारांनी दुर्लक्ष केल्यासारखे जाणवते. जंगलातले अर्थकारण वेगळे आहे. तेथला कोणीही दुसऱ्यावर आर्थिक दृष्टीने अवलंबून असतो असे मानले जात नाही, मानण्याचे कारण नाही. बरे २१ व्या वर्षी सर्व मुलगे आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतात असेही नाही. मग २१ चा आग्रह कशासाठी?

कुटुंबनियोजनाची आपल्या देशाची उद्दिष्टे साध्य करण्याचा हेतू त्यामागे असेल तर तोही साधणे शक्य नाही. पुरुषाच्या प्रजोत्पादकतेमध्ये ह्या तीन वर्षांनी काहीच फरक पडत नाही. २१ नंतरच्या आयुष्यात तो कितीही अपत्यांना जन्म देऊ शकतो. उलट त्याच्या ऐन गरजेच्या वेळेला त्याला ब्रह्मचर्यपालन सक्तीचे केल्याने त्याचे समाजस्वास्थ्यावर विपरीत परिणाम होऊ शकतात. (सगळीच मुले महाराष्ट्रीय ब्राम्हणांचे संस्कार घेऊन वयात येत नाहीत!) ज्ञात इतिहासातल्या शेवटच्या एका शतकाचा अवधी सोडल्यास स्त्रीपुरुषांचे विवाहाचे वय कमीच होते. आयुर्मान जसे वाढले तसे विवाहाचे वय वाढले आहे असे लक्षात येते. पण तेही भारताच्या फार थोड्या लोकसंख्येत वाढले आहे. भारताची बहुसंख्य जनता अजूनही सत्वरविवाहावर विश्वास बाळगणारी आहे. स्त्रीपुरुषांच्या तारुण्यसुलभ आणि अनावर जिज्ञासेला कृत्रिमपणे आवरून धरण्याचा समाजधुरीणांचा हेतू आम्हाला अजून कळलाच नाही. मुलांची ती जिज्ञासा ताणावयाची कारणे कळली तर बरे होईल. सध्या विवाहाचे वय वाढवीत नेऊन एकीकडे तरुणांच्या सहजप्रेरणांना सामाजिक नीतिनियमांच्या लगामाने आवरावयाचे आणि दुसरीकडे टी.व्ही. सिनेमातून त्यांच्या त्याच प्रेरणांना टाचा मारावयाच्या असे दृश्य दिसते आणि 'एड्स' ची लागण झपाट्याने होताना पाहून वर उल्लेखिलेल्या परिस्थितीशी त्याचा काही संबंध आहे की काय अशी शंका मनात येते.

बालविवाह अवैध ठरवून घेण्याचे स्वातंत्र्य ऐच्छिक ठेवण्यात आले तेही योग्य नाही. कारण ज्या अल्पवयीन - अज्ञान मुलांना आयुष्यभराचा करार म्हणजे काय ते समजण्याची अक्कल नाही अशांचा तो विधि अवैधच नव्हे तर शून्य (null and void) मानला जाणेच इष्ट आहे. सध्याच्या मसुद्याप्रमाणे बालविवाह न्यायालयाकडून अवैध ठरवून घेतला नाही तर तो वैध ठरेल व त्यामुळे त्याचे कराराचे स्वरूप नष्ट होईल. त्याला पवित्र विधीचे स्वरूप येईल. हे कदापि घडू नये असे आमचे मत आहे. मानसिक अपंगांसाठीही वयाची अट कायमच आहे, पण तेथे त्यांच्या आईबापांनी तो करार करावयाचा आहे.

५. विवाहासाठी निषिद्ध नाती कोणती ते ठरविताना रूढीला मान्यता देणे अगदी योग्य आहे. कोणत्या नातेसंबंधात विवाह झाल्यामुळे संततीच्या आरोग्यावर परिणाम होतो ते अजून स्पष्टपणे कळलेले नाही. अश्या परिस्थितीत कायद्याने त्यात दखल न देणेच इष्ट आहे.

६. विवाह हा एकदा करार म्हणून मान्य केल्यानंतर त्याची नोंदणी होणे इष्ट हे कोणीही मान्य करील. परंतु आपसांत पत्रे लिहून असा विवाह झाला असेल आणि तो नोंदला गेला नसेल तरी तो वैध मानावा.

७. विवाह वैध असो वा नसो, अपत्यांना वारसा मिळण्याच्या बाबतीत त्याविषयीचा कायदा सहानुभूती दाखविणारा असावा आणि घटस्फोट कोणत्याही परिस्थितीत सुलभ असावा. आपला विवाह टिकवून धरण्यासाठी सध्या दांपत्याला कोणतेच प्रयत्न करावे लागत नाहीत. एकमेकांचा त्यांनी कितीही छळ केला तरी विवाह मोडत नाही. यशस्वी वा अयशस्वी विवाह टिकवून ठेवण्याची जबाबदारी कायद्याची आहे. संबंधित व्यक्तींची नाही. त्यामुळे त्यांचे प्रेम वृद्धिंगत होत नाही. तरी यापुढे विवाहविच्छेद सोपा झाला पाहिजे. असे झाले तरच ज्यांना विवाह टिकविण्याची इच्छा आहे त्यांना विवाहानंतरही एकमेकांचा अनुनय करीत राहणे आवश्यक होईल. अशीच परिस्थिती सर्वांनी मिळून निर्माण करावी ही काळाची गरज आहे.

*201, श्रीमोहिनीराज, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर-10*

# भारतीय चर्चापद्धती : 3 - आन्वीक्षिकी

*श्रीनिवास हेमाडे*

*चर्चापद्धती, वाद, आन्वीक्षिकी*

---

'भारतीय चर्चा पद्धती' च्या पहिल्या भागात आपण 'वाद' या संकल्पनेचे आणि पद्धतीचे स्वरूप पहिले. दुसऱ्या भागात 'वाद'शी समांतर इतरही काही संकल्पनांचा थोडक्यात परिचय करून घेतला. भारतीय वादपद्धतीचा संबंध 'आन्वीक्षिकी' या विद्येशी जोडला जातो. या विद्येच्या स्वरूपात प्राचीन इहवाद आढळतो. आजच्या इहवादाशी हा इहवाद जुळणारा आहे. वादाचे प्रमेय व विषय अध्यात्मवादी न ठेवता इहवादी असले तर सामाजिक जीवनाचे प्रश्न अधिक काटेकोरपणे सुटू शकतात. त्या विद्येचा हा अल्पपरिचय.

---

प्रचलित 'आन्वीक्षिकी'चा शाब्दिक अर्थ 'अन्वेषण-विद्या' असा आहे. अन्वेषण म्हणजे शोध घेणे. 'आन्वीक्षिकी'चे मूळ 'अन्वीक्षा'मध्ये आहे. अनु = पाठीमागून जाणे, ईक्षण = पाहाणे, निरीक्षण करणे. कशाच्या पाठीमागून ? तर जे दिसते, अनुभवास येते, ज्याचे प्रत्यक्ष ज्ञान होते त्याच्या मागून, जे प्रत्यक्ष दिसत नाही, अनुभवास येत नाही, त्याकडे जाणे = अनुमान करणे. जे अनुमानाने कळते ती 'अनुमिती'.

वैदिक तत्त्वज्ञानाच्या संदर्भात परंपरेनुसार 'अन्वीक्षा'चे दोन अर्थ आहेत : (१) प्रत्यक्ष आणि आगम (वेद) वर आधारित अनुमान; (२) प्रत्यक्ष आणि शब्दप्रमाण यांच्या साह्याने प्राप्त होणाऱ्या विषयांच्या अनुसार (पश्चात्) त्यांचे ईक्षण म्हणजे पर्यालोचन करणे, अर्थात् ज्ञान मिळविणे. 'आन्वीक्षिकी' म्हणजे नेमके काय आहे ? याविषयी प्राचीन काळापासून बरीच वादग्रस्त मते मांडण्यात आली आहेत. लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मते तत्त्वज्ञान ह्या संस्कृत शब्दाचा मूळ प्राचीन पर्याय 'आन्वीक्षिकी' हा आहे. अन्वेक्षण म्हणजे अन्वेषण करून सिद्ध केलेले सिद्धान्त सांगणारे शास्त्र ते आन्वीक्षिकी, असे ते नमूद करतात. तत्त्वज्ञानाला प्राचीन भारतीय 'दर्शन' असे म्हणत. म्हणून येथे दर्शन म्हणजे अन्वेक्षण करणे, म्हणून आन्वीक्षिकी = तत्त्वज्ञान, दर्शन.

**डॉ. विद्याभूषण यांचे मत**

'आन्वीक्षिकी' हे अतिप्राचीन काळी वादाचे शास्त्र होते, 'वाद्कला' म्हणून या शास्त्राचा विकास अगदी प्राचीन काळापासून झाला. इ. स. पू. ६५० ते पहिले शतक या काळात 'आन्वीक्षिकी' शास्त्र बहरले होते. इ.स. च्या पहिल्या शतकात त्यात न्यायदर्शनातील 'पंचावयवी वाक्य' या संकल्पनेचा आन्वीक्षिकीत समावेश झाला; त्यानंतर त्यास 'न्यायशास्त्र' असे नाव मिळाले, असे डॉ. विद्याभूषण त्यांच्या 'A History of Indian Logic' मध्ये म्हणतात.

डॉ. विद्याभूषण यांच्या मते, आत्मा ही संकल्पना अगदी प्रथम वेद आणि उपनिषदे या संहितांच्या चर्चाविश्वात आली, त्यावेळी ती 'केवळ मानवी देहात वास करणारा आत्मा' या स्वरूपाची होती. ही आत्म्याची 'पहिली संकल्पना' होती. आत्म्याचे ज्ञान हे मानवी जीवनाचे उद्दिष्ट मानले गेले. त्यामुळे 'आन्वीक्षिकी म्हणजे आत्मविद्या' असा अर्थ तेव्हा प्रचलित झाला. नंतरच्या काळात सर्व चराचरांत, प्राणिमात्रांत असणारा जीव हाही 'वैश्विक आत्मा' आहे, अशी दुसरी संकल्पना वैदिक संहितांच्या चर्चाविश्वात रुजली. तिला 'ब्रह्म' हे नामाभिधान लाभले. या दुसऱ्या संकल्पनेत पहिली विलय पावून दुसरी अतिव्यापक बनली. या 'ब्रह्म'चेही ज्ञान किंवा 'ब्रह्म हेच ज्ञान' हे तत्कालीन वैदिक जीवनाचे उद्दिष्ट बनले (हा वेदान्ताचा गाभा). या ज्ञानाला ब्रह्मविद्या किंवा अध्यात्मविद्या असे नाव होते. त्यामुळे 'आन्वीक्षिकी म्हणजे ब्रह्मविद्या' असा अर्थ झाला. अशा रीतीने आत्मविद्या आणि ब्रह्मविद्या (किंवा अध्यात्मविद्या) अशा दोन विषयांचा अभ्यास म्हणजे आन्वीक्षिकी असे नवे समीकरण बनले.

महाभारत, रामायण, भागवत, पुराण, मनुस्मृती इत्यादी ग्रंथांत आन्वीक्षिकीचा उल्लेख 'दर्शन' असा येतो. त्याचवेळी अन्यत्र 'आन्वीक्षिकी' असाही वापर काही ठिकाणी आढळतो. त्यावेळी अर्थाबाबत गोंधळ होतो. तिथे 'दर्शन' आणि 'आन्वीक्षिकी' हा शब्द तर्क, कारणसिद्धान्त म्हणून वापरला आहे की आत्मा-ब्रह्म या अर्थाने वापरला आहे, याबाबतचा निर्णय संदर्भानुसार घ्यावा लागतो, असे डॉ. विद्याभूषण नमूद करतात.

आत्मा आणि ब्रह्म या संकल्पनांचे आन्वीक्षिकीवर आरोपण झाल्यामुळे 'आन्वीक्षिकी म्हणजे आत्मविद्या' असे झाले. आत्मा या ज्ञानवस्तूची चर्चा

करणारी आन्वीक्षिकी ही तत्त्वज्ञान किंवा दर्शन म्हणून ओळखली गेली तर तर्क, कारणसिद्धान्त स्पष्ट करणारी आन्वीक्षिकी ही तर्कशास्त्र म्हणून विकसित झाली. इ.स.पू. ५५० च्या दरम्यान मेधातिथी गौतम या ऋषीने आन्वीक्षिकीच्या 'तर्क' या अंगाचा विकास केला, तरीही अनेक शतके 'आन्वीक्षिकी म्हणजे तत्त्वज्ञान आणि तर्क' असा उभयान्वयी अर्थ प्रसारात होता. त्यात आन्वीक्षिकी म्हणजे तत्त्वज्ञान/दर्शन हा प्रभावी होता.

'आन्वीक्षिकी' म्हणजे हेतूचे (कारणसिद्धान्त) विश्लेषण हा अर्थ पहिल्या शतकानंतर प्रचलित झाला. याचे मुख्य कारण विद्याभूषण देतात की, वैदिक साहित्यात सुचविल्या गेलेल्या आत्मा, ब्रह्म, पुनर्जन्म, कर्मफल इत्यादी कल्पनांना तार्किकदृष्ट्या आधार देणे नितांत आवश्यक बनले होते. तो आधार आन्वीक्षिकीतून मिळाला, त्यामुळे आन्वीक्षिकी म्हणजे तार्किकता असे समीकरण बनले आणि 'आन्वीक्षिकी' ला हेतुशास्त्र, हेतुविद्या, तर्कशास्त्र, तर्कविद्या, वादविद्या, प्रमाणशास्त्र, वाकोवाक्य, तक्की, विमंसि अशी विविध नावे मिळाली. आन्वीक्षिकीच्या उपयुक्ततेत बदल झाला, तसा त्याच्या नावात बदल झाला. वस्तुतः 'आन्वीक्षिकी' चा मूळ अर्थ  केवळ तर्क, कारणमीमांसा, विवेक, बुद्धिप्रामाण्य हाच होता, असे डॉ. विद्याभूषण स्पष्ट करतात.

**आन्वीक्षिकीची गुरुपरंपरा**

डॉ. विद्याभूषण यांनी आन्वीक्षिकीची गुरुपरंपरा दिली आहे. दर्शन आणि तर्कविद्या या दोन्ही अंगाने ही गुरुपरंपरा होती. त्यांतील पहिले नाव चार्वाक (इ.स.पू. ६५० अंदाजे), दुसरे सांख्यदर्शनाचे आचार्य कपिल (इ.स.पू. ६५०-५७५), दत्तात्रेय - म्हणजे आज ज्यांना दत्तगुरु म्हणतात, ज्यांची मंदिरे असतात ते दत्तसंप्रदायवाले  दत्तमहाराज (इ.स.पू. ६५० अंदाजे),  त्यानंतर आयुर्वेदाचे प्रणेते मानले जाणारे पुनर्वसू आत्रेय (इ.स.पू. ५५०), सुलभा ही विदुषी (इ.स.पू. ५५०), अष्टावक्र (इ.स.पू. ५५०), मेधातिथी गौतम (इ.स.पू. ५५०). सर्व कालमान अंदाजे. यांत दत्तात्रेय यांचा अपवाद वगळता सर्वांनी तर्कविद्या म्हणून आन्वीक्षिकीचा अवलंब केला. दत्तात्रेयांनी भक्त प्रह्लाद, अलार्क इत्यादींना ही विद्या 'दर्शन' म्हणून शिकविली, तर्कशास्त्र या अंगाने नाही. इतरांनी आन्वीक्षिकी तर्कविद्या म्हणून विकसित केली. गौतमाने आन्वीक्षिकीचा हेतू, कारणमीमांसा या बाजूने सर्वांगीण

विकास करून वैदिक तर्कशास्त्र निर्माण केले.

**कौटिल्याचे योगदान**

आचार्य कौटिल्याने मात्र 'आन्वीक्षिकी'ला नेमका अर्थ दिला. कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील 'विद्यासमुद्देश' या दुसऱ्या प्रकरणात 'आन्वीक्षिकी'ची माहिती देण्यात आली आहे. तिला 'आन्वीक्षिकीस्थापना' म्हटले आहे.

*आन्वीक्षिकी त्रयी वार्त्ता दण्डनीतिश्चेति विद्याः।* (अर्थ. १.२.१)

अर्थ : आन्वीक्षिकी, त्रयी, वार्त्ता आणि दण्डनीति अशा चार विद्या आहेत.

कौटिल्याच्या आधी ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद हे तीन वेद (वेदत्रयी), वाणिज्य, शेती व उद्योगधंदे या उपजीविकेच्या साधनांचे यथार्थ ज्ञान (वार्त्ता) व दंडनीती (राजनीती – राज्याचे कायदे) या तीन क्षेत्रांतील ज्ञानालाच ज्ञान/विद्या असा दर्जा दिला गेला होता. राज्यकर्त्याने, अमात्य मंडळींनी, अभ्यासकांनी, विचारवंतानी आणि तत्त्ववेत्त्यांनी या तिन्हींवर प्रभुत्व मिळवले पाहिजे, असा जणू काही दंडक होता. या तिन्हींत 'आन्वीक्षिकी' ची भर घालून तिला 'चौथी विद्या' म्हणून ती प्रतिष्ठित केली कौटिल्याने. आता, 'आन्वीक्षिकी' म्हणजे काय? याचे तो उत्तर देतो : *सांख्यं योगो लोकायतं चेत्यान्वीक्षिकी ।* (अर्थ. १.२.१०)

अर्थ : सांख्य, योग आणि लोकायत ही तीन दर्शने म्हणजे आन्वीक्षिकी.

यांचा उपयोग काय ? तर कौटिल्य सांगतो :

*धर्माधर्मौ त्रयाम्। अर्थानर्थौ वार्तायाम्। नयानयौ दण्डनीत्याम्।*
*बलाबले चैतासां हेतुभिरन्वीक्षमाणा लोकस्योपकरोति ।*
*व्यसनेऽभ्युदये च बुद्धिमवस्थापयति ।*
*प्रज्ञावाक्यक्रियाविशारद्यं च करोति ।* (अर्थ. १.२.११)

अर्थ : त्रयीच्या संदर्भात धर्म काय व अधर्म काय, वार्त्ता व्यवहाराच्या संदर्भात अर्थ काय व अनर्थ काय, दंडनीतीच्या संदर्भात योग्य धोरण कोणते व चुकीचे धोरण कोणते, तसेच या तीन विद्यांचे परस्पर बलाबल, ह्या गोष्टीची योग्य कारणे शोधून (आन्वीक्षिकी) परीक्षा करते, म्हणून ती लोकांना उपकारक होते; संकटकाळी व अभ्युदयाच्या वेळी बुद्धीला स्थैर्य प्राप्त करून देते. त्याद्वारे व्यक्तीला आचार, विचार व उच्चार यात प्रावीण्य देते. थोडक्यात,'आन्वीक्षिकी' ही प्रज्ञा व भाषण यांच्यात उत्तमता प्रदान करते; त्यामुळे ती 'प्रज्ञावाक्यविशारद' आहे.

तिचे महत्त्व काय आहे ? तर कौटिल्य सांगतो :

*प्रदीपः सर्वविद्यानां उपायः सर्वकर्मणाम् ।*

*आश्रयः सर्वधर्माणां शश्वद् आन्वीक्षिकी मता ।* (अर्थ.१.२.१२)

अर्थ : आन्वीक्षिकी ही वादविद्या ही (इतर) सर्व (तिन्ही) विद्यांचा मार्गदर्शक दिवा, सर्व कर्मांचा उपाय व सर्व धर्मांचा आधार आहे. धर्म म्हणजे शुद्ध नैतिक वर्तन, अर्थ म्हणजे उपयुक्ततावादाशी जुळणारे साध्य व काम म्हणजे प्रत्यक्ष उपभोग्यवस्तु व जीवनक्रम हा त्रिवर्ग कौटिल्यास मान्य होता.

**देबीप्रसाद यांचे मत**

'आन्वीक्षिकी'च्या आशयाचे स्पष्टीकरण डॉ. देबीप्रसाद चट्टोपाध्याय यांनी त्यांच्या What is Living and What is Dead in Indian Philosophy या ग्रंथात दिले आहे. डॉ. देबीप्रसाद चट्टोपाध्याय यांनी ‘सांख्य, योग आणि लोकायत ही तीन दर्शने म्हणजे आन्वीक्षिकी’ या संकल्पनेची सविस्तर चर्चा केली आहे.

न्याय-वैशेषिक, सांख्य-योग, पूर्वमीमांसा-उत्तरमीमांसा (वेदान्त) ही वैदिक षड्दर्शने आणि बौद्ध, जैन व चार्वाक ही तीन अवैदिक दर्शने मिळून भारतीय दर्शनपरंपरा रचली जात असताना दोन्हीतील केवळ सांख्य, योग आणि लोकायत या तीन दर्शनांचा समावेश कौटिल्याने 'विद्या' (ज्ञान) म्हणून का केला ? न्याय-वैशेषिक, पूर्वमीमांसा-उत्तरमीमांसा यांची कोणतीही चर्चा करणे सोडाच, पण साधा उल्लेखही कौटिल्य करीत नाही. त्याचे कारण काय ? शिवाय बौद्ध-जैन यांनाही कौटिल्य खिजगणतीतही का धरीत नाही ? अशा अत्यंत मौलिक व मूलभूत प्रश्नांचे विश्लेषण देबीप्रसाद देतात.

देबीप्रसादांच्या मते, कौटिल्याने वैदिक-अवैदिक अशी मांडणी न करता इहवादी आणि अन्-इहवादी अशी दर्शनांची रचना केली. ती करताना कौटिल्य त्रयी मान्य करतो. पण तो त्रयी आणि आन्वीक्षिकी यांत स्पष्ट फरक करतो आणि त्यांना वेगळे करतो. त्रयीचा अर्थ कौटिल्याच्या मते विशिष्ट स्वरूपाचे वैदिक धर्मशास्त्र की ज्यात वर्णव्यवस्था व आश्रमव्यवस्था आहे. आणि आन्वीक्षिकी ही संपूर्ण स्वतंत्र विद्याशाखा आहे. ते एक वेगळे दर्शन आहे. वार्त्ता, दण्डनीति हीही स्वतंत्र ज्ञाने आहेत.

अर्थशास्त्राची रचना पाहाता कौटिल्याने आन्वीक्षिकीचा उपयोग करूनच ते रचले आहे, असे लक्षात येते. राज्यशास्त्र रचताना, राज्य करताना सांख्य, योग आणि लोकायत यांची दृष्टीच उपयोगी आहे, हे तो केवळ सूचित करीत नाही, तर त्यांचा आग्रह धरतो. म्हणून या तिघांचे ज्ञान, अध्ययन व अध्यापन ही पूर्ण वेगळी विद्याशाखा आहे. ते एक वेगळे दर्शन आहे. त्या दर्शनाच्या आधारेच मानवी जीवन रचले जावे असा कौटिल्याचा आग्रह होता.

हे कसे घडते ? सांख्य, योग आणि लोकायत यांचा अर्थ कसा लावायचा ? तर सांख्य हे तर निखळ निरीश्वरवादी अवैदिक दर्शन होते. ते कौटिल्य स्वीकारतो. मग योगचा अर्थ काय ? कौटिल्यास अपेक्षित असलेला योग याचा अर्थ पतंजलीचे योगदर्शन असा नाही, तर त्याकाळी (आज नीटसे स्वरूप मिळालेली) न्याय-वैशेषिक मते म्हणजे योग आहे. फणिभूषण आणि कुप्पुस्वामी शास्त्री या दोन विद्वान अभ्यासकांचा दाखला देऊन देबीप्रसाद दाखवितात की न्यायाची दार्शनिक मांडणी तर्क (विवेकशक्ती) आणि वैशेषिकाची दार्शनिक मांडणी अणुवादी होती. फणिभूषण यांच्या मते योग म्हणजे अणूंचा संयोग आणि कुप्पुस्वामींच्या मते योग म्हणजे युक्ति किंवा तर्क. त्यामुळे न्याय-वैशेषिक यांच्या तत्त्वज्ञानाला 'योग' म्हटले आहे. तर्कवाद आणि अणुवाद ही इहवादी मांडणी आहे. तिचा वैदिकतेशी संबंध नाही. तिसरे लोकायत हे चार्वाकांचे पर्यायी नाव, खरे तर तेच योग्य नाव. चार्वाकानी वैदिकच नाही तर बौद्ध आणि जैन यांनाही प्रखर विरोध केला. केवळ प्रत्यक्ष आणि नंतर प्रत्यक्षावर आधारित अनुमान हेच ज्ञान आणि अर्थ व काम हेच पुरुषार्थ; त्यावर आधारलेले जीवन ही निखळ इहवादी मांडणी आहे.

येथे देबीप्रसाद  हे लक्षात आणून देतात की कौटिल्याने भारतीय तत्त्वज्ञान ही संकल्पनाच मुळात बदलून टाकली होती. तो वेदांच्या अधिकाराचा प्रश्न उपस्थित करीत नाही तर वास्तव, जग, व जीवन यांच्याविषयीचा दृष्टिकोन आध्यात्मिक, ईश्वरवादी, किंवा परलोकवादी न ठेवता तो शुद्ध तार्किक, बुद्धिप्रामाण्यवादी ठेवला पाहिजे, अशी स्पष्ट भूमिका घेतो. ही अनुभववादी, प्रयोगवादी वैज्ञानिक दृष्टी होती; तीच आपणांस उपयुक्त आहे. तर्कविद्या आणि तार्किकतायुक्त दर्शनच सर्व विद्यांमध्ये श्रेष्ठ आहे (वेद नाही !) असे सांगत

*"प्रदीपः सर्वविद्यानां...." असा दावा करतो.*

देबीप्रसाद असे दाखवून देतात की  सांख्य, योग आणि लोकायत ही तिन्ही दर्शने मुळात अवैदिक, नास्तिक आणि इहवादी होती. या तिन्ही दर्शनांनी जगाची निर्मिती, मानवी जीवनाचा अर्थ, उद्दिष्ट, दुःख-सुख यांचे विवेचन करताना कोणत्याही परतत्त्वाचा – ईश्वर, ब्रह्म, आत्मा, कर्म – यांचा आधार न घेता केवळ मानवी जीवनाचे निरीक्षण करून आपले पूर्ण इहवादी दर्शन मांडले.

तत्कालीन राजकीय जीवनावर आन्वीक्षिकीचा खूप मोठा प्रभाव होता. रामायणाच्या उत्तरकांडात श्रीराम काही विद्वानांशी हेतुवाद करताना आढळतो. बलराम व श्रीकृष्ण हे धनुर्वेद, राजनीतिशास्त्र आणि आन्वीक्षिकी विद्या जाणत होते. राजा जनक या विद्येत कुशल होता.

**लक्ष्मणशास्त्री जोशींचे मत**

कौटिल्याच्या अर्थशास्त्राबाबत  शास्त्रीजी मत व्यक्त करतात की कौटिल्याने उल्लेख केलेले लोकायत म्हणजे चार्वाक. परलोक-कल्पना, धर्मशास्त्र, उपनिषदे आणि वेदविद्या यांच्यापासून वेगळी म्हणजे पूर्ण ऐहिक विचारपद्धतीवर आधारलेली सामाजिक विद्या म्हणजे अर्थशास्त्र, हे त्यांना मान्य आहे. रोमन कायदा जसा धर्माचा भाग नव्हता तसा अर्थशास्त्रकालीन कायदा पारलौकिक धर्मविचाराचा भाग राहिला नाही, असेही ते नमूद करतात.

हे निश्चित आहे की कौटिल्याचे अर्थशास्त्र व त्याची आन्वीक्षिकीविद्या जर भारतीय जीवनव्यवहारात टिकून राहिली असती तर इथल्या समाजजीवनाचे चित्र खचितच बदलू शकले असते.  अकबर, राजे शिवाजी, टिपू सुलतान किंवा बाजीराव इत्यादी राजे मंडळी काळाच्या ओघात इतिहासपुरुष बनली इतकी ती प्रतिभावंत होतीच; पण त्यांना हा ग्रंथ उपलब्ध झाला असता तर कदाचित आणखी वेगळा इतिहास घडू शकला असता !  असे का घडू शकले नाही हा प्रश्न आपण विद्यमान काळात  उपस्थित केला पाहिजे.

याबाबत दोन गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे. एकतर अतिप्राचीन काळी ही विद्या अस्तित्वात होती. दुसरे, अतिप्राचीन काळी अशी काही चर्चाविद्या अस्तित्वात होती, हे केवळ योगायोगाने विसाव्या शतकात ज्ञात झाले ! जेव्हा ज्ञात झाले तेव्हा असेही लक्षात आले की या विद्येतील काही भाग स्वीकारला

गेला, काही भाग नाकारला गेला. अनुक्रमे तिची प्रचंड स्तुति आणि निंदा करण्यात आली. जसे की 'आन्वीक्षिकी' तील 'हेतू' या साधनालाच केंद्रीभूत मानून 'आन्वीक्षिकी' लाच 'तर्कशास्त्र' असे नाव दिले गेले. हे राजकारण आत्मघातकी, चुकीचे व दिशाभूल करणारे ठरले. याबाबत "कौटिलीय अर्थशास्त्र" चे मराठी भाषांतरकार पं. र. पं. कंगले म्हणतात, केवळ "*हेतुभिरन्वीक्षमाणा लोकस्योपकरोति* (अर्थ. १.२.११) या शब्दांमध्ये '*हेतुभिरन्वीक्षमाणा*' या शब्दप्रयोगात 'हेतू' चा उपयोग तर्काचा केवळ साधन म्हणून निर्देश आहे. शिवाय त्या सूत्रात व नंतरच्या श्लोकात आन्वीक्षिकीचे केलेले वर्णन सांख्य, योग यांसारख्या दर्शनांनाच लागू पाडण्यासारखे आहे, तर्कशास्त्राला नाही ! त्यामुळे 'आन्वीक्षिकी' चा अर्थ तर्कविद्या असा करता येणार नाही." (अर्थात हे स्पष्ट करतानाही 'लोकायत' हे नाव घेण्याचे पं. कंगले काही ठिकाणी टाळतात. )

**महत्त्व**

'आन्वीक्षिकी' विद्यमान इहवादी लोकशाही जीवनरीतीत उपयुक्त ठरू शकते, हा मुद्दा विद्यमान काळात जागतिक स्तरावर गंभीरतेने अभ्यासला जात आहे, यातच तिचे महत्त्व अधोरेखित होते. उदाहरणार्थ, राष्ट्रीय सुरक्षा समिती आणि भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद् यांच्यावतीने २०१३ मध्ये "कौटिल्याचे अर्थशास्त्र : एतद्देशीय संकल्पना आणि शब्दावली यांचा विकास" या विषयावर राष्टीय चर्चासत्र आयोजित केले होते. या चर्चासत्रात कौटिल्याच्या अर्थशास्त्राची समकालीन उपयुक्तता यावर भर दिला गेला. समितीचे सल्लागार शिवशंकर मेनन, सरव्यवस्थापक डॉ. अरविंद् गुप्ता आणि इतर तज्ज्ञ, अभ्यासक इत्यादींनी ज्या संकल्पनांवर भर दिला त्यात विद्यासमुद्देश आणि आन्वीक्षिकी यांचा समावेश होता.

आन्वीक्षिकीला तर्कशास्त्र म्हणून दिल्या गेलेल्या रूपाचे प्रात्यक्षिक चरक संहितेत मिळते. त्याचे स्वरूप आपण पुढील लेखात पाहू.

(संदर्भसूचीसाठी कृपया लेखकाशी संपर्क करावा – सं.)

ईमेल: shriniwas.sh@gmail.com

# मराठा मोर्चे : एक आकलन

*विलास सोनवणे*

मराठा,  अस्मिता, सामाजिक लढा, सत्याग्रह

---------------------------------------------------------------------

महाराष्ट्रात अलीकडच्या काळात निघालेल्या विराट् मराठा मोर्च्यांनी अनेक नवे प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यामागील समूहमानस समजून घेण्याचा हा एक प्रयत्न. ह्या विषयावर व्यापक चर्चा घडावी ह्या अपेक्षेने तो प्रकाशित करीत आहोत.

----------------------------------------------------------------------

कोपर्डी, जिल्हा - अहमदनगर येथे मराठा समाजातील एका गरीब आणि अल्पवयीन मुलीवर चार दलित तरुणांनी बलात्कार करून तिचा खून केला. या घटनेने महाराष्ट्रातील समस्त मराठा समाज अतिशय क्षुब्ध झाला. आपण राज्यकर्ता समाज असल्याचे भान असल्यामुळे सगळ्या महाराष्ट्रात जिल्ह्याच्या ठिकाणी लाखोंच्या संख्येने मूक मोर्चे काढून त्याने अत्यंत संयत प्रतिक्रिया देत, त्या घटनेचा निषेध करायला सुरुवात केली आहे. आतापर्यंत महाराष्ट्रातील बहुसंख्य जिल्ह्यांत असे निषेध मोर्चे पार पडलेले आहेत. या सगळ्या मोर्च्यांचे वैशिष्ट्य म्हणजे पहिल्यांदाच स्त्रिया लहान मुलांसकट त्यांत मोठ्या प्रमाणात सहभागी होत आहेत. आतापर्यंत मोर्च्यांमध्ये सहकुटुंब सहभागी होण्याची परंपरा फक्त आदिवासी समाजामध्ये होती. या निषेधमोर्च्यांच्या निमित्ताने मराठा समाजातही ही परंपरा सुरू होत आहे. खरे म्हणजे या निमित्ताने इतिहासात पहिल्यांदाच मराठा समाज हा समाज म्हणून एकत्र येत आहे, ही अतिशय सकारात्मक बाब आहे. आम्ही या बाबीचे स्वागत करतो, एवढेच नव्हे तर इतर समाजानेसुद्धा त्याचे अनुकरण केले पाहिजे असेही आवाहन करतो.

मराठा समाजाबद्दल अनेक प्रकारचे गैरसमज इथल्या ब्राह्मणी, भांडवली व्यवस्थेने यशस्वीपणे पसरवलेले आहेत. महाराष्ट्राच्या लोकसंख्येमध्ये 40% च्या आसपास वाटा हा परराज्यांतून स्थलांतरित झालेल्यांचा आहे. उरलेल्या 60%

पैकी 32% मराठा समाज असल्याचे सांगितले जाते. खरे म्हणजे हा आकडा न तपासताच त्याच्यावर विश्वास ठेवला जातो. दहा वर्षांपूर्वीपर्यंत मंत्रिमंडळातील व विधानसभेतील मंत्री व आमदारांच्या संख्येमुळे लोकसंख्येबाबतचा हा आकडा खरा आहे, असे मानले जात होते. गेल्या दोन निवडणुका शहरी व ग्रामीण भागातील बदललेल्या लोकसंख्येनुसार घेण्यात आल्यामुळे शहरी भागातील आमदार व खासदार यांच्या संख्येमध्ये अमराठी व अमराठा स्थलांतिरतांचा टक्का संख्या मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मागच्या निवडणुकीत सत्तेवर आलेल्या भाजप-सेनेचे मंत्री व आमदार ह्यांच्या संख्येतील अमराठी व अमराठा यांच्या टक्केवारीत गुणात्मक बदल झालेले आहेत. महाराष्ट्रात शहरीकरणामुळे झालेल्या बदलांना प्रामुख्याने मराठा समाजच बळी पडलेला आहे. जमिनी विकल्यामुळे तात्पुरती श्रीमंती आली, पण मिळालेल्या संपत्तीचे भांडवलात रूपांतर करण्याची कला या कष्टकरी शेतकरी समाजाला माहीत नव्हती व त्याच्या आत्मकेन्द्री नेतृत्वाने ही कला त्याला शिकवलीदेखील नाही. त्यामुळे ही सगळी संपत्ती अनुत्पादक बाबींत खर्च झाली. शेती असेपर्यंत कुशल गणल्या गेलेल्या या समाजातील स्त्री-पुरुष पैसे संपल्यानंतर अकुशल ठरले व शेती असताना शेतीच्या कौशल्यासोबत दरिद्री असूनसुद्धा, जो स्वाभिमान होता, जी पत होती ती दोन्हीही शहरीकरणात नष्ट झाली. गेल्या वीस वर्षांत असा स्वाभिमान व पत गमावलेल्यांची संख्या कैक पटीने वाढली आहे. *एकट्या पुणे शहरात दहा वर्षांपूर्वीपर्यंत शेतकरी म्हणून असलेले कौशल्य व पत जमीन गेल्यामुळे अकुशल ठरलेल्या मराठा जातीच्या दोन लाखांच्या आसपास स्त्रिया मोलकरीण म्हणून धुण्या-भांड्याची कामे करतात.* ग्रामीण भागामध्येसुद्धा सततचा दुष्काळ, उत्पादनखर्चामध्ये सतत होत असलेली वाढ व उत्पादनाला मिळणारा तुटपुंजा मोबदला, यामुळे महाराष्ट्रात संख्येच्या बळावर प्रमुख शेतकरी जात असलेला मराठा समाज मोठ्या प्रमाणात दारिद्रीकरणाच्या प्रक्रियेत ढकलला गेला आहे. *महाराष्ट्रात आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांपैकी 90 टक्क्याच्या वर शेतकरी कुणबी-मराठा समाजाचे आहेत.* जागतिकीकरणाच्या प्रक्रियेंतर्गत जमिनीची मालकी, कर्ज, महसूल, तसेच बँकिंग ह्या क्षत्रांशी संबंधित कायद्यांमध्ये झालेल्या बदलांमुळे शेतकऱ्यांच्या दरिद्रीकरणाची प्रक्रिया अधिकाधिक गतिमान होत गेली

आहे. यामुळे 'आई जेवू घालीना आणि बाप भीक मागू देईना' अशी शेतकरी समाजाची स्थिती झाली आहे. या कुचंबणेला कुठेही वाट मिळत नव्हती. कोपर्डीच्या घटनेने या समाजात वर्षानुवर्षे व्यवस्थेच्या विरोधात निर्माण झालेल्या असंतोषाला वाट मिळालेली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1937 साली मुंबई काउन्सीलमध्ये आमदार म्हणून निवडून आल्यानंतर जे खोतीविरोधी बिल मांडले, त्याच्या आधाराने 1948 साली महाराष्ट्रात कुळकायदा करण्यात आला. त्यामुळे महाराष्ट्रात जमीनदारी नष्ट होऊन कुळ असलेले शेतकरी जमिनीचे मालक झाले. ज्या जातींना ह्या परिवर्तनाचा फायदा मिळाला, त्यांमध्ये कुणबी-मराठा जातींची संख्या सगळ्यात मोठी होती. महाराष्ट्राप्रमाणे बाबासाहेबांच्या खोतीविरोधी बिलाच्या आधारे संसदेने 1 एप्रिल 1957 रोजी जमीनदारीनिर्मूलन कायदा केला. पूर्वीचा बंगाल प्रांत व निजामाचा प्रदेश यांमध्ये या कायद्याची अंमलबाजवणी झाली नाही, पण पश्चिम उत्तर प्रदेश, हरयाणा, राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेशचा माळवा प्रदेश, पश्चिम कर्नाटक व केरळ या विभागात या कायद्याची अंमलबजावणी झाली. त्यामुळे गुजरात व माळव्यामध्ये पाटीदार समाज, तसेच राजस्थानपासून जम्मूपर्यंत जाट व गुज्जर या समाजांना त्याचा फायदा मिळाला आहे. महाराष्ट्रातील कुणबी-मराठा समाजाप्रमाणेच या जातीसुद्धा प्रभावशाली जाती म्हणून राजकारणात पुढे आल्या होत्या. शेती आतबट्ट्याची होण्याची प्रक्रिया 70च्या दशकापासून हरित क्रांतीच्या आगमनासोबत सुरू झाली होती. त्याविरोधात उत्तर भारतात महेन्द्रसिंह टिकैत यांच्या नेतृत्वात भारतीय किसान युनियन, महाराष्ट्रामध्ये शरद जोशींच्या नेतृत्वात शेतकरी संघटना, कर्नाटकामध्ये प्रा. नंजुन्दास्वामी यांची रयतु संगम इ. संघटनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांची आंदोलने सुरू झाली. गुजरातमध्ये 1974पासून राखीव जागाविरोधी मुख्य मागणी करीत आंदोलने झाली. 90 च्या दशकात जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर या संघटना व नेतृत्व हळूहळू प्रभावहीन होत गेले. या नेतृत्वहीन परिस्थितीत पश्चिम भारतातील सगळेच प्रभावशाली मानले गेलेले समाज सापडले. त्या-त्या राज्यामध्ये सत्तेत असलेल्या सरकारांसमोर या सर्व जातींनी मोठे आव्हान उभे केले. गुजरातमध्ये

हार्दिक पटेलच्या नेतृत्वात सगळा पाटीदार समूह संघटित झाला आहे, हरयाणामध्ये जाट समाजाने तर सगळ्या हरयाणात आग लावली. त्याअगोदर गेली चार-पाच वर्षे राजस्थानपासून ते जम्मूपर्यंत पसरलेल्या गुज्जर समाजाने अनेक वेळा आठवडेच्या आठवडे रेल्वे बंद पाडली आहे. महाराष्ट्रात ओसरत चाललेल्या प्रभावामुळे अस्वस्थ असलेल्या मराठा समाजाचा कोपर्डीच्या घटनेने भ्रमिनरास केला आहे. गेली दोन वर्षे आधी काँग्रेस-राष्ट्रवादीच्या आणि आता बीजेपी-सेनेच्या सरकारने मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला ज्या पद्धतीने जिरवायचा प्रयत्न केला, त्यामुळे समाजाच्या अस्वस्थतेमध्ये भर घातली गेली. या सगळ्या बाबींचा उद्रेक म्हणून, एक - आम्हाला राखीव जागा द्या किंवा राखीव जागांचे धोरण पूर्णपणे बदला. दोन - अॅट्रॉसिटी कायदा रद्द करा या मागण्या केन्द्रबिन्दू बनल्या.

**इतर समाजांच्या प्रतिक्रिया**

या आंदोलनाबद्दल महाराष्ट्रातल्या दलित व मुस्लिम समाजाच्या येत असलेल्या प्रतिक्रिया अतिशय बोलक्या आहेत. दलितांचे, विशेषतः बौद्धांचे वेगवेगळे पक्ष वेगवेगळ्या घोषणा करताहेत. सुरेश मानेंच्या नेतृत्वात अलीकडेच स्थापन झालेल्या बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी (बीआरएसपी) या पक्षाने एकीकडे समशेरखान पठाण तर दुसरीकडे ब्रिगेडियर सावंत यांच्या सोबतीने हे सगळे आरएसएसचे षडयंत्र आहे अशी भूमिका घेतली आहे. नुकतेच बीजेपीच्या कोट्यातून केन्द्रीय मंत्रिमंडळात समाजकल्याण राज्यमंत्री झालेले आरपीआयचे नेते आयुष्यमान रामदास आठवले यांनी कुठल्याही परिस्थितीत अॅट्रॉसिटीचा कायदा रद्द होऊ देणार नाही अशी घोषणा केली आहे. सोबतच मुस्लिम समाजाला चुचकारण्यासाठी बीफबंदी होऊ देणार नाही अशीही घोषणा केली आहे. जाता-जाता त्यांनी पॅन्थरच्या दिवसातल्या आंदोलनांकडे वळावे लागण्याचा इशाराही दिला आहे. त्या इशाऱ्यानंतर महाराष्ट्रातल्या ग्रामीण भागात ज्या प्रतिक्रिया उमटल्या, त्यांची दखल घेऊन आठवलेंनी सपशेल शरणागती पत्करली आहे. प्रकाश आंबेडकरांचा अपवाद सोडता उर्वरित जवळपास सगळ्या संघटनांनी व नेत्यांनी अशाच प्रकारच्या प्रतिक्रिया दिल्या

आहेत. मुस्लीम समाज ही एकसंध चिरेबंद रचना (मोनोलिथ) आहे, हा आर एस एसचा लाडका सिद्धांत आहे. 90 च्या दशकात महाराष्ट्रात मुस्लीम ओबीसी आंदोलन उभे झाले, जे पुढे सर्व देशात पसरले. ह्या आंदोलनाने धर्मापेक्षा जातीची अस्मिता मजबूत करत या देशाशी समाज म्हणून असलेली आपली नैसर्गिक मुळे पक्की केली. मुस्लिमांचे मागासपण हे प्रामुख्याने त्यांतील वंचित जातींचे मागासपण आहे व म्हणून हिंदूंप्रमाणे मुस्लिमातील दुर्बल जातीनाही जातीच्या आधारावर आरक्षण मिळायला हवे अशी भूमिका घेऊन व त्यावर यशस्वी लढा उभारून  मुस्लीम ओबीसीनी मुस्लीम मोनोलिथची मिथ तोडण्याचा प्रयत्न केला. 1994 पासून मंडल आयोगाच्या शिफारसीना अनुसरून मुस्लिम-ओबीसीचं आरक्षण अस्तित्वात आले. मात्र ह्या आंदोलनात एकेकाळी नेतृत्वात असणारे पाशा पटेल, प्रा. बेन्नूर व जावेद पाशा यांनी मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मुस्लिमाना धर्माच्या आधारावर आरक्षण द्यावे ही मागणी लावून धरायला सुरुवात केली आहे. या निमित्ताने त्यांनी मुस्लिम-ओबीसीचा मुद्दा सोडून देऊन मुस्लिम आरक्षणाच्या निमित्ताने मुस्लिमांचे मोनोलिथ उभे करत आरएसएसचा अजेन्डा पुढे रेटायला सुरुवात केली आहे. आतापर्यंत अबू आझमीपासून ओवेसीपर्यंत व काँग्रेसच्या हुसेन दलवाईपर्यंत मुसलमानांतील सगळ्या उच्चजातीय, उच्चवर्णीय नेत्यांनी मुस्लिम मोनोलिथ उभे करण्याची भूमिका घेतली होती. आता पटेल, बेन्नूर व पाशा  त्यांच्या रांगेत उभे राहिले ही दुर्दैवाची बाब आहे. कमीअधिक प्रमाणात सगळ्या दलित संघटनांचीसुद्धा मुसलमानांच्या बाबतीत जाणतेअजाणतेपणे हीच भूमिका आहे. या सवंग घोषणांच्या मागे लागताना कधीकाळी ह्या देशातील समतावादी सामाजिक परिवर्तनाचे नेतृत्व करण्याला आपण बांधील होतो याचा त्यांना विसर पडल्याचे स्पष्टपणे जाणवते. श्रावण देवरेंसारख्या ओबीसींच्या स्वयंभू नेत्यांनी ॲट्रॉसिटीचा कायदा ओबीसी आणि भटक्या विमुक्तांना लावण्याची मागणी केली आहे. या सर्व घडामोडींमधून मराठा समाजाला एकटे पाडण्याचा डावपेच स्पष्ट दिसतो.

### शेतीवरील अरिष्टाचे खरे कारण: भांडवली शेती

खरे म्हणजे ब्रिटिशांनी भारतावर कब्जा केल्यानंतर तोपर्यंत अस्तित्वात असलेली शेतीवरील करपद्धती बदलली. ब्रिटिश येईपर्यंत भारतात *शेतीउत्पादनाचा एक हिस्सा कर* म्हणून राजाला द्यावा लागत असे. ब्रिटिशांनी पिकाचा हिस्सा नाकारला आणि *जमिनीवर कर* लावला. तोपर्यंत समाजात जातीची उतरंड अस्तित्वात असली तरी सगळ्या उत्पादक जाती सर्व प्रकारच्या उत्पादनासाठी एकमेकांवर पूर्णपणे अवलंबून होत्या. त्यामुळे त्यांच्यातले सामाजिक संबंध व सांस्कृतिक व्यवहार सौहार्द्रपूर्ण होते. अण्णाभाऊ साठ्यांच्या काही कादंबऱ्यांमध्ये याचे वर्णन वाचायला मिळते. करपद्धती बदलल्यामुळे भारतामध्ये पहिल्यांदा वतनदारीच्या ऐवजी आधी सावकारी व नंतर जमीनदारी पद्धत उदयाला आली. पूर्व भारतात पूर्वाश्रमीच्या बंगाल सुभ्यामध्ये ब्रिटिशांनीच युरोपियन पद्धतीची जमीनदारीव्यवस्था कायम केली. या नव्या वर्गव्यवस्थेत जमिनीचे केन्द्रीकरण झाल्यामुळे ब्रिटिशांना त्यांच्या इंग्लंडमधल्या कारखान्यांना आवश्यक अशी कापूस, ज्यूट, नीळ, अफू ही नवी पीकपद्धती सुलभपणे अंमलात आणता आली. तेव्हापासून आत्तापर्यंत भारतामध्ये सामाजिक रचनेमध्ये व संबंधामध्ये जे बदल देशीय, जागतिक भांडवलशाहीने केले त्याचे परिणाम सगळाच समाज कमी-अधिक प्रमाणात भोगतो आहे.

1947 साली स्वातंत्र्याच्या नावाने झालेल्या सत्तांतरानंतर सत्तेवर आलेल्या राज्यकर्त्यांनी विकासाच्या नेहरू मॉडेलच्या नावाखाली हरितक्रांतीच्या रूपाने शेतीमधील भांडवली बाजारपेठेची प्रक्रिया अधिकाधिक तीव्र करत नेली. त्यासाठी त्यांनी जमीनसुधारणा कायद्यांचा धूर्तपणे वापर केला. सत्तर वर्षांच्या प्रवासात आता हे मॉडेल कोसळलेले आहे. त्यामुळे कमी-अधिक प्रमाणात भारतातील सगळ्याच शेतकरी जाती त्या-त्या राज्यात या उद्रेकात सामील होत आहेत.

या उद्रेकाला एखाद्या जातीच्या उद्रेकाचे स्वरूप दिसत असले तरीसुद्धा लाखोंच्या संख्येने सामील होणारा शेतकरी, जातीसाठी त्यात सामील होत नाही आहे. त्यामुळे ज्या लोकांना असे वाटते की दलितांचे प्रतिमोर्चे काढून किंवा ओबीसींना त्यांच्या अंगावर घालून हा उद्रेक डिफ्युज करता येईल. तर त्यात असे

वाटणाऱ्यांची राजकीय अपरिपक्वता आहे.

औरंगाबाद आणि उस्मानाबादचे मोर्चे संकुचित घोषणा घेऊन निघाले हे खरे आहे. पण त्यानंतर हळूहळू इतर शेतकरी जातींना त्यात सामावून घेण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे. मोर्चेकऱ्यांच्या प्रतिक्रियेत निश्चितपणे शेतीचे संकट व ग्रामीण व शहरी बेरोजगारीचा प्रश्न आता केन्द्रस्थानी आलेला आहे. कोणाच्याही राखीव जागांना धक्का न लावता आम्हांला राखीव जागा मिळाल्या पाहिजेत, त्यासाठी घटनेत बदल करण्याची गरज असली तर ती केली पाहिजे हा आवाज जोरदारपणे यायला लागला आहे. या पार्श्वभूमीवर सत्तर वर्षांतल्या विकासाने प्रत्येक जातीतल्या एका विशिष्ट घटकांना फायदा झालेला आहे. ते घटक अन्य सांस्कृतिक पर्याय नसल्यामुळे संस्कृतीने ब्राह्मण झालेले आहेत. या सर्व जातीय नवब्राह्मणांचा प्रयत्न ही चळवळ धार्मिक दंगलीत वा जातीय दंगलीत परिवर्तीत करण्याचा आहे. त्यामुळे हा लढा सर्व जातीतील नवब्राह्मणांच्या विरोधात सुरू करावा लागेल.

या सगळ्या लढ्यात स्वतःला संसदीय मार्क्सवादी, सशक्त मार्क्सवादी, समाजवादी, परिवर्तनवादी इ. म्हणविणाऱ्या बुद्धिमंतांची बौद्धिक दिवाळखोरी पूर्णपणे उघडी पडली आहे.

सवंग घोषणांच्याऐवजी जागतिक भांडवलाचे व त्यांच्या सर्वपक्षीय व सर्व जातींतील क्रीमिलीयर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वर्गाचे डावपेच समजावून घेऊन ते उधळण्याची सर्वांगीण तयारी करण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे.

**ईमेलः** vilassonawane@hotmail.com

# भक्ति - सूफी समन्वय

*नाजीर पठाण*

भक्ति, सूफी, हिंदू-मुस्लीम समन्वय

---------------------------------------------------------------------------

इस्लाममधील वाहिबी (मूलतत्त्ववादी) वि. अन्य विचारधारा हा संघर्ष जगभरात पेटून उठला आहे. त्याच बरोबर इस्लामचे एकसाची आक्रमक स्वरूप जनमानसावर ठसविण्याचे कामही जोरात सुरू आहे. ह्या पार्श्वभूमीवर हिंदूंमधील अद्वैत दर्शनाशी नाते सांगणाऱ्या, गेली अनेक शतके हिंदू-मुस्लीम समन्वय साधणाऱ्या सूफी पंथाचा परिचय करून देणारा हा लेख.

---------------------------------------------------------------------------

सूफी संत हे इस्लामचे शांतिदूत म्हणून ओळखले जातात. अकराव्या शतकात अरबस्थानात सूफी संप्रदायाचा विकास घडून आला. अल गझाली या प्रसिद्ध सूफीच्या काळात सूफी संप्रदायात नवीन बदल झाला. येथूनच भारतातसुद्धा सूफींचे आगमन होऊन बाराव्या-तेराव्या शतकात सूफी संप्रदायाचा विस्तार भारतभर झाला.

भक्तिसंप्रदायाने ज्याप्रमाणे महाराष्ट्राच्या सामाजिक सांस्कृतिक जीवनात मोठ्या प्रमाणावर बदल घडवून आणला, त्याचप्रमाणे सूफी संप्रदायानेसुद्धा महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनाला आकार दिला. भक्तिपंथाने ज्या समतेचा पुरस्कार केला त्याच समतेचा अंगीकार सूफीसंप्रदायाने केला. भक्तिसंप्रदायाप्रमाणेच सूफीसंप्रदायानेसुद्धा परमेश्वराच्या नामस्मरणावर भर दिला, बाह्य अवडंबर टाळले. भक्तिपंथाप्रमाणे सूफी हे भारताचे सांस्कृतिक वैभव आहे.

भारतात येण्याच्या काळातच सूफीपंथ हा कर्मकांडाऐवजी ज्ञानमार्गाकडे वळला. इस्लामच्या द्वैतवादी विचारसरणीत सूफी संप्रदायाने "वहदत-उल-वजूद' म्हणजेच अद्वैतवाद आणून एका नव्या युगाला सुरवात केली. गजनीचे रहिवासी

अबुल हसन हुजवेरी हे सूफी संत पंजाबमधील लाहोर येथे स्थिरावले. त्यांनी ''कशफूल महजुब' हा ग्रंथ लिहिला. बाबा फकरुद्दीन हे सूफी आंध्रप्रदेशातील प्रेनुकोंडा येथे स्थायिक झाले. नंतर तेराव्या शतकात सय्यद बंदा नवाज गेसुदराज यांचे भारतात आगमन झाले.

ख्वाजा अबु इसहाक सामी चिस्ती, शेख अब्दुल कादर जिलानी, जियाउद्दीन नजीब सुहरावर्दी, ख्वाजा बहाउद्दीन नक्शबंद इत्यादी सूफी संतांनी भारतात सूफी संप्रदायाच्या विविध शाखा उपशाखा रुजविण्याचे कार्य केले. याच वेळेला महाराष्ट्रातसुद्धा सूफी संतांचे आगमन झाले.

मोमिन आरिफ देवगिरीला तर जलालउद्दीन हे खुल्ताबादला स्थायिक झाले. जेव्हा महाराष्ट्रात यादवांच्या सत्तेचा उतरता काळ सुरू झाला होता त्या वेळेला मुंतजबोद्दीन जरजरीबक्ष हे त्याच्या सातशे अनुयायासह खुल्ताबाद येथे स्थायिक झाले. मोईजोद्दीन यानी पैठण परिसरात विशेष कार्य केले. बाबा शाह मुसाफर, मीर मुहम्मद, ख्वाजा यादगार खान, सैय्यद मासुम, रहेमत आला शाह, शाहबुद्दीन, नितामुद्दीन, दावल शाहवली, शाह नसिरुद्दीन, शाह लतिफ कादरी, लुता अली शाह, रूननुद्दीन, बुरहानुद्दीन, जष्नुद्दीन, रज्जक शाह, जान अलाशाही, निर्गुन शाहवली, रहमत आला या सारख्या अनेक सूफी संतांनी महाराष्ट्रात आपल्या कार्याला सुरुवात केली.

**सूफी कोण** ?

अरबस्थानात मदिना शहरातील मशिदीसमोर एक चबुतरा होता. या ठिकाणी बसून काही लोक सतत अल्लाहचे नामस्मरण करत. या लोकांची ओळख ''सूफी' (चबुतरा = सुफा-सूफी) अशी होऊ लागली. शेख बशीर म्हणतात की, ज्याचे अंतकरण ''साफ' आहे तो ''सूफी' होय. ''सोफिया' याचा अर्थ ज्ञान व सूफी म्हणजे ज्ञानी असासुद्धा अर्थ दिला जातो. याशिवाय हे लोक लोकरीचे जाडेभरडे कपडे वापरत म्हणून 'सूफ' (लोकर) चा 'सूफी' असा अर्थ होऊन हे लोक सूफी ह्या नावाने ओळखले जाऊ लागले. ज्याप्रमाणे बुद्धाच्या अनुयायांनी चिवर नेसायला सुरवात केली होती, त्याच प्रमाणे सूफींमध्ये कपड्यांना व डोक्यावरील फेट्यांना ठिगळ लावण्याची चाल होती. असे करण्यामागे तो सूफी निष्कांचन

आहे हे दाखविणे हा हेतू होता. जुनैद बुगदादी यांनी सूफींना धरित्रीची उपमा दिली आहे.

**सूफींचे तत्त्वज्ञान**

सूफी तत्त्वज्ञानाची मुळे आपणास कुरानमध्ये दिसून येतात. नंतर अरबस्थानाच्या बाहेर जसजसा सूफी पंथ वाढू लागला, इतर पंथांच्या संपर्कात येऊ लागला, तसतसा या संप्रदायाने इतर पंथीयांची चांगली तत्त्वे आत्मसात करायला सुरवात केली. ख्रिश्चन धर्माच्या संपर्कात आल्यावर परमेश्वरचिंतन, नामस्मरण यांवर सूफींनी भर दिला. ग्रीक साहित्याचा अरबीमध्ये अनुवाद झाल्यानंतर परत एकदा सूफीपंथास चालना मिळाली. बौद्ध, जैन, हिंदू तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडताच सूफींनी अनेक तत्त्वे स्वीकारली. हे आदान-प्रदान दोन्ही बाजूने झाले. *अहं ब्रह्मास्मि* हे तत्त्व आणि *अन-हल-हक* हे तत्त्व समसमान आहे. भक्तिसंप्रदायाप्रमाणे सूफींनीसुद्धा गूढवादाचा स्वीकार केला होता. सूफींनी मानव व परमेश्वर यांचे संबंध महत्त्वाचे मानून याकरिता ईश्वराला सर्वशक्तिमान ठरविले. सूफींमध्ये तात्त्विक भूमिकेचा पुरस्कार हुसेन-बिन-मंसूर या सूफी संतांनी केला. इब्न सीना यांनी परमेश्वराच्या सर्वात्मक विश्वव्यापी रूपावर भर दिला. शंकराचार्य व इब्न सीना याच्या तात्त्विक विचारांमध्ये आपणास साम्य दिसून येईल. सुहरावर्दी याच्या मते जोपर्यंत आत्मा परमात्म्यात विलीन होत नाही तोपर्यंत तो पुन्हा पुन्हा जन्म घेत राहतो. हीच बाब मंडुकोपनिषदात मांडली आहे. *(मंडुकोपनिषद 3.2.2)*

इब्न अल अरबी यांनी परमेश्वराचे प्रतिबिंब निसर्ग व मानव यांच्यात पाहण्याचा प्रयत्न केला. अब्दुल करीम अल जिली यांच्या काळात सूफी तत्त्वज्ञान अत्युच्च स्थानाला पोहचले. यात एकेश्वरवादाचा प्रखर पुरस्कार केला गेला.

मुक्तीकरिता सूफी साधना करत. यात सूफी साधकाला विविध टप्प्यांमधून जावे लागते. त्याला ‘मकामात' म्हटले गेले. सूफी संप्रदायात भक्ताला, साधकाला ‘जिक्र' करावा लागे. भक्तिपरंपरेतील नामस्मरण आणि सूफी ''जिक्र' यात कमालीचे साम्य दिसते. भक्तिपरंपरेप्रमाणेच सूफीपरंपरेत गुरूला महत्त्वाचे स्थान होते.

**सूफी-भक्ति समन्वय**

महाराष्ट्रातील समाजमन कायम बहुप्रवाही राहिले आहे. परस्परविरोधी विचार सहजगत्या स्वीकारणे हे येथील मातीचे वैशिष्ठ्य. भारताबाहेर उदयास आलेला इस्लाम धर्म व सूफीसंप्रदाय इकडे येताच येथे रुजले, फोफावले. समानता, निष्कांचन वृत्ती, मानवता हे गुण सूफींमध्ये ठायी ठायी दिसून येतात. महाराष्ट्रात आगमन झाल्यानंतर सूफींनी लवकरच येथील लोकमनाला आकर्षित केले. येथे सूफींना मोठ्या प्रमाणावर अनुयायी मिळाले. महाराष्ट्राच्या मातीत रुजलेल्या भक्तिपंथाशी संपर्क आल्यानंतर परत एकदा सूफींमध्ये बदल झाला. सूफींनी मराठी भाषा आत्मसात करून आपला उपदेश मराठीमध्येसुद्धा दिला. इतकेच नव्हे तर अनेक मध्ययुगीन सूफींनी मराठीमध्ये पद्यचना केली. महाराष्ट्रात व्याप्त जातिव्यवस्थेवर प्रहार केला.

महाराष्ट्रात जवळप्रास 49 मुस्लिम सूफी मराठी संतकवी म्हणून ओळखले जातात. डॉ. यु.म. पठाण, डॉ. रा.चिं. ढेरे, डॉ. कृ.ना.चिटणीस, प्रो. ताराचंद, डॉ. अलिम वकील, डॉ. मुहम्मद आजम यांसारख्या विद्वानांनी महाराष्ट्रीय सूफींवर प्रकाश टाकला आहे.

श्रीगोंदा येथील शेख महंमद बाबा हे सूफी म्हणतात:

*याती मुसलमान। महाराष्ट्रि वचनें । ऐकती आवडीनें ।*

मंगळवेढ्याला लतिफ शहा हे प्रसिद्ध सूफी झाले. त्याच्याबद्दल महीपती लिहितात --

*लतिफ शाह मुसलमान ।*
*परमभाविक वैष्णवजन ।।*

महीपती लतिफ शहा याना परमभाविक वैष्णव म्हणतात, यावरून आपणास तत्कालीन संस्कृतीसमन्वयाची कल्पना यावी.

वजीरुल मुल्क मुंतोजी ऊर्फ शहा मुर्तुझा कादरी यांनी 'संगीत मकरंद' या नावाने मराठीत टीकाग्रंथ लिहिला, शिवाय 'विजय वैभव' हा त्यांचा एक ग्रंथ होय. संगीत मकरंदाचा शेवट करताना ते लिहितात,

"श्रीमन्महाराजाधिराज श्री संगीतसहितशिरोमणी श्रीखलचिवंशवर्णन जीया दौलतखानाचा नंदन वजीरुलमुल्क तेन कृतासंगीत मकरंदश्या टीका' यावरून त्यांच्या मराठी प्रेमाची साक्ष पटते. दुसरे मुंतोजी बामणी (मेत्यराजय) यांचे मूळ नाव 'शहामुर्तुझा कादरी' होते. ते म्हणतात,

*शहा मुतबजी बहमणी ।*
*जिनमें नहीं मनामनी (मनमानी) ।।*
*पंचीकरणका खोज किए ।*
*हिंदू मुसलमान एक कर दिए।।*

यावरून त्यांनी एकोप्यावर भर दिल्याचे सिद्ध होते. 'प्रकाशदीप' हा त्यांचा ग्रंथ होय. यातील मंगलाचरण महत्त्वाचे आहे. ते असे-

*श्रीगणेशाय नम:*
*श्रीमद् गुरवे नम:*
*श्रीरामचंद्राय नम:*

याच मुतोजींनी जातिभेदावर टीका केल्याचे त्याच्या ग्रंथात दिसते. ते म्हणतात,

*शूद्र, वैश्य, क्षत्रिय, ब्राह्मण। हा देहाचाची गुण ।*
*तुज नाहि जातिवर्ण । यांसि तू भुलो नको।*

त्यांनी या ग्रंथाशिवाय 'सिद्धसंकेत', 'हिंदू-इस्लाम दर्शनपरिभाषा कोश', 'जीवोद्धरण', 'स्वरूप समाधान', 'अद्वैत प्रकाश', 'अमृतानुभव', 'अनुभवसार', 'गुरुलीला' यांसारख्या ग्रंथांची रचना केली.

अंबर हुसेन हे गीता टीकाकार म्हणून ओळखले जातात. ‘अंबर हुसेनी' ही त्याची मराठी गीता टीका होय.

चांद बोधले उर्फ चांदसाहेब कादरी हे संत एकनाथाचे गुरू होय. या चांद बोधल्यांना दत्ताचा अवतार मानले जाई.

‘ज्ञानाचा एका, नामयाचा तुका आणि कबिराचा शेका' या लोकोक्तीमध्ये एका - एकनाथ, तुका – तुकाराम आणि शेका - शेख महंमद ही त्रिमूर्ती आदरणीय आहे. हे शेख महंमद श्रीगोंद्याचे. त्यांनी ‘योगसंग्राम', ‘प्रवनविजय', ‘निष्कलंक-प्रबोध', ‘भक्तिबोध', ‘आचारबोध', ‘भारूड' यांची रचना केली. ‘आचारबोध' या रचनेत ते म्हणतात,

*सुच सोवळी, हीन याती । नेणें विटाळ विपत्ति ।*
*सोवळे-वोवळे भाविती ।।*
*लटिका व्युत्पत्ती । शेख महंमद बोलती ।।*

आपल्या भारुडात त्यानी हरी व अल्ला यांच्यात भेद केला नाही. या रचनेशिवाय त्यानी ‘दुचेश्मा' हा परिभाषाकोशसुद्धा लिहिला.

आलमखान हे नागेश संप्रदायाचे एक प्रमुख संतकवी. यांच्या कवितासुद्धा भक्ति-सूफी समन्वयावर प्रकाश टाकतात. याशिवाय जंगली फकीर, शहामुनी, लतिफशहा, शेख सुलतान या सूफी संतकवींनी सुद्धा निखळ मराठीत रचना केली. महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनात त्यांनी आपले एक वेगळे स्थान निर्माण केले. महाराष्ट्रात सर्वधर्मसमभावाचे तत्त्व रुजविण्यात, एकोप्याची भावना निर्माण करण्यात त्यांचे अतुलनीय योगदान राहिले. आपल्या लिखाणातून या सूफींनी समाजप्रबोधन, विषमतेला विरोध, अंधश्रद्धेवर कुठाराघात केले.

सूफी आणि भक्तिसंप्रदाय यांत सांस्कृतिक, वैचारिक आदानप्रदान झाले. अनेक विद्वान अभ्यासक असे आदानप्रदान झाल्याचे मान्य करतात. परंतु काही विरोधकसुद्धा आहेत, जे असे आदानप्रदान झाल्याचे अमान्य करतात. जर हे आदानप्रदान झाले नसते तर अनेक सूफींना मराठी रचना करण्याची आवश्यकता

भासली नसती; अनेक पंथीय संतांनी, कविंनी मुस्लिम सूफींचे गुणगान केले नसते.

सूफींच्या दैनंदिन जीवनातील अनेक शब्द आज आपल्या मराठीत प्रचलित आहेत. **फना** - पारमार्थिक स्थिती = **फन्ना** - संपविणे; **जिक्र** - नामस्मरणाची सर्वोच्च स्थिती = **जिकर** - नेटाने; **हाल** - सूफी जीवाची अंतिम अवस्था = **हाल** - त्रास होणे; **छबिना - शबीना** = देवाची पालखी; **छल्ला - शिष्य** = अपभ्रंश रूप - चेला - **शिष्य** यांसारखे अनेक शब्द सूफींचा महाराष्ट्र संस्कृतीवरील प्रभाव दाखवितात. नाथपरंपरेमधील 'अवधूत' व सूफी 'अवलिया' यांच्यात साम्य आहे. नाथपंथीयाची 'अलखनिरंजन' ही हाळी आणि सूफींची 'अनहलहक' ही हाळी यांत कमालीचे साम्य आहे. त्याचा अर्थ एकच – 'तो मीच आहे'. आपल्या मताचा प्रचारप्रसार करण्यासाठी सूफी प्रभातफेरी काढत. त्या वेळेला हातात डफ घेऊन जी गीते म्हटली जात त्याला "करीमा' असे म्हणत. याला प्रत्युत्तर म्हणून रामदास स्वामींनी खड्या आवाजात 'मनाचे श्लोक' म्हणण्याची प्रथा सुरू केली असे इतिहासाचार्य वि.का.राजवाडे नमूद करतात.

सूफींची साधी राहणी व उच्च विचारसरणी येथील सर्वसामान्य जनतेला फार आवडली. यामुळे मोठ्या प्रमाणावर तळागाळातील लोक या सूफींचे अनुयायी झाले.

आजच्या परस्पर अविश्वासाच्या युगात सूफींचे हे समन्वयाचे कार्य अधोरेखित होणे फार गरजेचे आहे. सूफींनी या भूमीत आपल्या आचरणातून, कृतीतून, वृत्तीतून, साहित्यातून कायमच एकोप्यावर, शांततेवर, सौहार्द्रावर, बंधुत्वावर भर दिला. जर सूफींचे हे दुर्लक्षित कार्य समोर आले तर आज जो परस्पर अविश्वास, संशयी वातावरण आहे त्यावर उतारा मिळेल. एक हजार वर्षांपासून सूफींनी महाराष्ट्रात, देशात जातीय, धार्मिक सलोख्यावर भर दिला. सूफी-भक्ति याच्यात कायम समन्वय राहिला. सुरुवातीपासूनच यांच्यात सर्व थरात आदानप्रदान राहिले. महाराष्ट्र मानसाला विकसित करण्यात सूफींचे हे योगदान आपण नजरेआड करता कामा नये.

**ईमेल**: nsf.pat@gmail.com

# पुस्तक परिचय : द सर्कल

*प्राजक्ता ठुबे*

कादंबरी, तंत्रज्ञानाचा सामाजिक परिणाम, मानवी स्वातंत्र्य

---

1984 हे वर्ष उलटून गेले, पण जॉर्ज ऑर्वेलने दाखविलेला एकाधिकारशाहीचा धोका अजून टळला नाही. उलट तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे व सोयीसाठी आपले स्वातंत्र्य गहाण टाकण्याच्या वाढत्या मनोवृत्तीमुळे तो धोका अधिकच गडद होत आहे. तंत्रज्ञान व विकास हे परवलीचे शब्द मानणाऱ्या आपल्या आधुनिक समाजाला धोक्याचा लाल कंदील दाखविणाऱ्या एका आशयघन कादंबरीचा हा संक्षिप्त परिचय.

---

'द सर्कल' या कंपनीची सुरुवात 'टाय'ने (तिच्या तीन संचालकांपैकी एक) लावलेल्या 'टू यू' या सॉफ्टवेअरच्या शोधापासून होते. ह्या सॉफ्टवेअरमुळे ग्राहकांना फक्त एका अकाऊन्ट आणि पासवर्डमार्फत त्यांच्या संपूर्ण सामाजिक आणि खाजगी आयुष्याचे व्यवस्थापन करण्याची सोय उपलब्ध होते. याच अकाऊन्टमार्फत लोकांना स्वतःची स्वतंत्र तांत्रिक ओळख मिळणार असते. 'टू यू' सॉफ्टवेअरद्वारे लोकांचे खाजगी आणि सामाजिक आयुष्य व्यापून टाकणाऱ्या आणि सोशल नेटवर्किंगच्या क्षेत्रात मक्तेदारी स्थापन केलेल्या 'द सर्कल' या कंपनीच्या आधुनिक तंत्रज्ञानाधारित विचार-प्रणालीची मांडणी प्रस्तुत कादंबरीमध्ये केलेली आहे.

मानवी समाजरचनेमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाला पूरक असे महत्त्वाचे बदल घडविण्याच्या आणि आपल्या स्पर्धकांचा नायनाट करण्याच्या उद्देशाने ही कंपनी सातत्याने वेगवेगळे प्रकल्प राबवत असते. मग ते सहारा वाळवंटातील वाळूचे कण मोजण्याचा अचाट प्रयोग असो की मूल हरवू नये म्हणून लहानपणीच त्याच्या शरीरात ईलेक्ट्रॉनिक चिप बसविणे असो, किंवा शरीरात बसविलेल्या ईलेक्ट्रॉनिक चिपद्वारे त्या व्यक्तीच्या कुटुंबाचा मध्ययुगापर्यंतचा

इतिहास जाणून घेणे असो, की अगदी महत्त्वाकांक्षी म्हणजे खऱ्या अर्थाने सुरक्षित, पारदर्शक आणि उत्तरदायी समाजाची निर्मिती करण्यासाठी लोकप्रतिनिधींच्या दैनंदिन घडामोडी लोकांना प्रत्यक्ष पाहण्याची सोय असो... या सर्व प्रकल्पांमार्फत कंपनी तिचे पूर्वनियोजित व घोषित उद्दिष्ट - "जगात जे जे काही घडले आहे आणि घडते आहे ते सर्व काही सर्वांना माहिती झालेच पाहिजे" - पूर्ण करण्याकडे वाटचाल करत असते.

आपल्यालाही एका टप्प्यावर असे वाटून जाते की, खरोखरीच ह्या सर्व प्रक्रियेतून आधुनिक तंत्रज्ञानाधारित आदर्श आणि परिपूर्ण समाजरचनेचा आकृतिबंध खरोखरच साकारला जात आहे की काय? परंतु जसजसे कंपनीचे अंतिम ध्येय नजरेच्या टप्प्यात येत जाते, तसे एक नवी समाजरचना जाणीवपूर्वक तयार करण्याचा प्रयत्न दिसून येतो - जिथे स्वातंत्र्य असेल पण 'नाही' म्हणण्याचे नाही, जिथे व्यवस्था तुमच्यासाठी योग्य-अयोग्यतेच्या गोष्टींची निवड करेल, जिथे गुपित असणे म्हणजे खोटारडेपणाचे आणि खाजगी आयुष्य (इतरांना माहिती नसलेले) असणे म्हणजे चोरटेपणाचे लक्षण समजले जाईल आणि लोकही likes, feeds आणि followers च्या नादात या मूल्यांचा आणि जीवनशैलीचा स्वीकार करतील. मग राजकीय व्यवस्थेलाही समाजाच्या या बदलत्या मूल्यांची आणि मागण्यांची दखल घेणे अनिवार्य होईल; पर्यायाने खऱ्या अर्थाने पारदर्शक समाज आणि राजकीय व्यवस्था स्थापन करण्याच्या नावाखाली मग संपूर्ण समाजाच्या सामाईक, सामूहिक आयुष्यावर कंपनीला कब्जा करता येईल - हेच कंपनीचे अंतिम ध्येय असते. सर्व प्रकल्पांमार्फत अमाप लोकप्रियता मिळवून माहिती आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मक्तेदारी स्थापन करायची आणि यातूनच पुढे लोकप्रियतेच्या दबावतंत्राचा वापर करून वेगवेगळ्या देशांतील लोकशाही शासनसंस्थांशी हातमिळवणी करून लोकशाही कार्यप्रणालीची सूत्रे अप्रत्यक्षरीत्या हाती घ्यायची आणि जगावर पडद्यामागून हुकूमत गाजवायची अशी त्यामागील व्यूहरचना असते.

कथेची नायिका "मेई' - प्रथमपासूनच बुजरी; आयुष्यात परिस्थितीमुळे आपल्या वाट्याला आपल्या योग्यतेच्या गोष्टी न मिळाल्याचा तिचा समज आणि त्यातून आलेला गंड; स्वतःशीच संवाद करणारी, एकांतात नौकानयन करून

स्वतःजवळच जाणारी; संवेदनशील, समंजस पण महत्त्वाकांक्षी - एका निम्न मध्यमवर्गीय पार्श्वभूमीतून येऊन नंतर 'द सर्कल' कंपनीच्या अत्युच्च सुखसोयींनी परिपूर्ण अशा जीवनशैलीत काम करू लागते. आपल्याला मिळालेल्या या संधीचे सोने करण्यासाठी आपल्या जिवाचा आटापिटा करते आणि याच प्रयत्नात ती कंपनीच्या लोकप्रियतेचा चेहरा बनते.

मेई आणि तिचा पूर्वायुष्यातील मित्र मर्सर यांच्यातील प्रत्येक संवाद खाजगी आणि सार्वजनिक आयुष्यांमधील द्वंद्वाची प्रकर्षाने जाणीव करून देतो. या दोघांतील प्रत्येक संवाद वाचताना आपणही अंतर्मुख होतो आणि आपण इतके काही सोशल मीडियाच्या आहारी गेलो नसल्याचे दाखले स्वतःलाच नकळतपणे देऊ लागतो.

जेव्हा टाय (कंपनीचा संस्थापक-संचालक) मेईला तिच्या प्रेमात पडल्यानंतर कंपनीने उभ्या केलेल्या कृत्रिम संरचनेतला फोलपणा दाखवून द्यायचा स्वतःच प्रयत्न करतो तेव्हा आपल्या अस्वस्थतेचे टोक गाठले जाते. तो कबूल करतो की, 'ट्रू यू' सॉफ्टवेअरचा त्याने लावलेला शोध ही सहज, जाता जाता घडलेली घटना असून, त्याचा आळस ही त्यामागची प्रेरणा होती. या गोष्टीला इतके महत्त्व देऊन संपूर्ण समाजव्यवस्था या पोकळ कल्पनेवर उभी करणे धोक्याचे असल्याची जाण तिला करून देण्याचा तो शेवटपर्यंत प्रयत्न करतो. पण ती टायवर विश्वास ठेवून, स्वतःशी प्रामाणिक राहून कंपनीचा चेहरा म्हणून सर्वांना या सगळ्यातला फोलपणा दाखवून द्यायचा प्रयत्न करेल की याच व्यवस्थेला सामाजिक जीवनाच्या विकासाचा पुढचा टप्पा समजून टायच्या अज्ञानाची कीव करेल?...

डेव्ह एगर्सची 'द सर्कल' ही कादंबरी हा एक वैज्ञानिक कल्पनाविलास. पण ती वाचत असताना जॉर्ज ऑर्वेलच्या '1984' ची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. काही दशकांपूर्वी साम्यवाद हा हुकूमशाहीचे आधुनिक निरागस रूप आहे असे काही लोकशाहीप्रणेत्यांचे म्हणणे होते. पण जसजशी कादंबरीची पाने उलटत जातात, तसतशी तंत्रज्ञानाच्या अति आहारी गेलेली आधुनिक लोकशाहीसुद्धा एक फसवी व्यवस्था होऊन हुकूमशाहीचे प्रतीक होऊ शकते अशी भीती मनात घर करू लागते. हेच ह्या कादंबरीचे यश आहे.

# अनुभव : मी मराठा ?

*प्रियांका तुपे*

मराठा, जातीय अस्मिता

------------------------------------------------------------------------

मराठा मोर्च्यांच्या पार्श्वभूमीवर आरक्षणाने नव्हे, तर शिक्षण व स्वतंत्र व्यवसाय उभारण्यातून मराठा युवकांचे प्रश्न सुटू शकतील असे मांडणारा हा स्वानुभव

------------------------------------------------------------------------

मराठा जातीत जन्माला आल्याचा मला जराही अभिमान नाही, असण्याची आवश्यकता अजिबात नाही, यात माझं काहीही कर्तृत्व नाही. याउलट याची लाज वाटावी अशाच  काही घटना घडल्या आहेत. आरक्षणाचा मला वैयक्तिक काहीच तोटा झाला नाही. मला दहावीला ८४% मार्क्स मिळाले, बारावीला ७८%. देशातल्या सर्वोत्तम कॉलेजेसपैकी एक असणाऱ्या रुईया कॉलेजमध्ये मला ॲडमिशन मिळाली, कोणत्याही अडचणीशिवाय. गावाकडे अगदीच थोडीशी कोरडवाहू शेती असल्याने त्याचा तसा कधीच काही फायदा झाला नाही. वडिलोपार्जित कोणतीही प्रॉपर्टी नाही. वडील स्वतः घरातले मोठे असल्याने त्यांच्यावर खूप लहानपणीच मोठ्या खटल्याची जबाबदारी पडली. माझ्या वडिलांनी दिवसरात्र मेहनत करूनही ते आमच्यासाठी विशेष काही करू शकले नाहीत. कारण त्यांच्या कमाईचा बराच पैसा हा त्यांचे आई-बाबा, भावंडे, त्यांची शिक्षणं, लग्नं यांतच खर्च झाला. आमच्याकडे माझ्या बाबाने घाटकोपरमध्ये स्लममध्ये घेतलेलं एक छोटं घर इतकंच होतं. इन्वेस्टमेंटचा फायदा किंवा अगदीच वाईट वेळ आली तर आसरा या दूरदृष्टीने घेतलेलं. हे घरही बाबाच्या आजारपणात झालेल्या प्रचंड खर्चामुळे विकावं लागलं. 2009 मध्ये बाबा गेला, घर गेलं. सगळं शून्य झालं. त्यात आम्ही 6 भावंडं.

आर्थिक परिस्थिती हलाखीची झाली, तरीही आपल्याला आरक्षण हवं होतं असं कधी वाटलं नाही. फी माफ केली जावी असं मात्र वाटून गेलं एकदोनदा. 2009 मध्ये दहावी नुकतीच पास झाले आणि बाबा गेला तेव्हा ऊर

बडवत न बसता एका जिममध्ये रिसेप्शनिस्ट म्हणून नोकरी करायला सुरुवात केली. सकाळी 6 ते 1 जिम, नंतर कॉलेज, कॉलेजवरून आल्यावर मुलांची ट्यूशन घेणे, वयाच्या सोळाव्या वर्षापासून फक्त चार साडेचार तास झोप. तरी माझ्या एकटीच्या कमाईत 7 माणसांचे कुटुंब चालणे अशक्य होते. आईला घरकामे करायची सुरवात करावी लागली. खूप वाईट वाटले. रडू यायचे आईवर ही वेळ आली म्हणून. पण त्यावेळी सगळी घडी बसेपर्यन्त पर्याय नव्हता. पण किती दिवस असे चालणार? म्हणून अवघ्या पाचशे रुपये भांडवलावर भाजी विकण्याचा एक छोटा स्टॉल सुरू केला. खूप मेहनतीने हा व्यवसाय केला. सुरुवातीपासून काही चांगल्या सवयी लावल्या. दररोजचा चोख हिशोब, वीकली ऑडिट, मंथली ऑडिट, एन्युअल टर्नओवर. एखादी मोठी कंपनीच जबाबदारीने चालवत आहोत. अशा पद्धतीने काम केले. होम डिलिवरी वगैरे सारख्या गोष्टी केल्या. नुसत्या भाजीच्या व्यवसायावर समाधान नाही मानले. सणासुदीच्या दिवशी फुले, फुलांच्या माळा, तोरणे असे सगळे विकायचो. त्यात चांगले प्रॉफिट होऊ लागले. मग मी बारावीत नोकरी सोडून फक्त हा व्यवसाय आणि अभ्यास करू लागले. तोवर याच प्रॉफिटमधून घरी छोटी मेस सुरू केली. इंजीनिअरिंग, मेडिकलच्या बॅचलर मुलांना डबे पुरवू लागलो. आईची बाहेरची कामे कमी झाली. मग भाजीच्या स्टॉलच्या बाजूला एक छोटा नाश्त्याचा स्टॉल सुरू केला. उत्तम चव, स्वच्छता, चांगली गुणवत्ता, होम डिलिवरी यामुळे हा व्यवसाय ही खूप कमी काळात सेट झाला. अडचणी अनेक होत्या, काही लोकांची भाईगिरी, बीएमसी, व्यवसाय म्हणले की गृहीत धरलेलं नुकसानही. त्यात कुणा नातेवाईकांचा काडीचा सपोर्ट नाही. त्यात आम्ही सगळ्या मुली. पण काही चांगले लोकही होते यात आम्हाला मदत करणारे. तर असे छोटे छोटे व्यवसाय अत्यंत अल्प भांडवलात सुरू केले. संपूर्ण कुटुंबाने खूप मेहनत केली. महापालिकेने केलेल्या डिमॉलिशनमुळे भाजीचा स्टॉल बंद करावा लागला. पण नाष्ट्याचा व्यवसाय अशा पद्धतीनं सेट केलाय की संपूर्ण कुटुंबाचा बराच खर्च त्यातून निघतो. पुरणपोळी व इतर छोट्या ऑर्डरही घेतो. आज आईला बाहेर काम करायला जावे लागत नाही. आराम मिळतो. याचे खूप समाधान मिळते. दरम्यान मी महाराष्ट्र 1 मध्ये नोकरी केली. त्यानंतर मला वुमन एम्पॉवरमेंट

जेंडर इक्वालिटीसाठी एक छान फेलोशिप मिळाली, ज्याचे मला खूप चांगले पैसेही मिळतात आणि रिसर्चही करता येतो. आज सगळे सुखात आहे असे नाही, पण परिस्थितीत खूप सुधारणा आहे. माझा लहान भाऊही शहरातल्या उत्तम असणाऱ्या बालमोहन विद्यामंदिरात शिकतो.

ही सगळी लंबी चौडी कहाणी सांगण्यामागे मला असे वाटते की  मराठी आणि त्यातही मराठा आणि त्यातही रयत मराठा नेहमी बोंबाबोंब करतो - आम्हाला आरक्षण नाही, आमची जमीन नाही, काही पिकत नाही, जे अगदी माझ्या केसमध्येही खरे आहे. नोकऱ्यांमध्ये आरक्षण नाही, जमीन नाही तर तुम्ही व्यवसायाचा गांभीर्याने विचार का करत नाही? 500 रुपये भांडवलावर सुरू केलेल्या धंद्याची प्रगती करत जर पुढे त्यावर माझे 7 जणाचे कुटुंब पोसले जाऊ शकते, तर स्वतःचे काही सुरू करण्याचा विचार किती जण करतात? किती तरी संस्था शिक्षण, व्यवसाय यासाठी मदत करतात, तिथे जात वगैरे निकष नसून फक्त गुणवत्ता लागते, याची किती मराठा मुलांना माहिती आहे?

किती तरी स्कॉलरशिप्स, फेलोशिप्स असतात, रिसर्च प्रोजेक्ट असतात, त्याची माहिती आपण घेतो का ? स्वतःची एखादी कन्सेप्ट डेवलप करून त्यावर पैसे कमावता येतात, याचा विचार तरी कधी आपल्या मेंदूत आला का? विविध प्रकारच्या संशोधनांसाठी अभ्यासाने प्रपोजल तयार करून सरकारी किंवा खाजगी संस्थांकडून ग्रांट मिळवून एक चांगला प्रोजेक्ट करता येईल का, ज्याचा समाजाला आणि आपल्यालाही उपयोग होईल? सरकार तरुणांच्या व्यवसायासाठी काय स्किम राबवते, त्यातून आपल्याला काय मदत होईल? एकट्याने जरी नाही तरी मित्र मैत्रिणी मिळून एखादे स्टार्ट अप करू शकतो का? उन्हाळ्यात गंमत म्हणून सहज आम्ही बहिणीनी 300 रुपये गुंतवून फक्त 2 महीने ताक विकलं होतं, तेही रोज 1-2 तास. त्यात 10,000 रुपये नेट प्रॉफिट होऊ शकला. म्हणजे गोष्टी नक्कीच अशक्य नाहीत. कोणत्याही व्यवसायाची लाज वाटता कामा नये. प्रचंड जिद्द आणि लाथ मारू तिथे पाणी काढण्याची वृत्ती आणि कृती हवी. सोपे नाही पण अशक्यही नाही. किमान आरक्षणावर खापर फोडण्यापेक्षा स्वतःचे काही निर्माण करण्याचा विचार तर करूया.

(फेसबुकवरून)

# 'पिंक'च्या निमित्ताने

*समीक्षा फराकटे*

चित्रपट, पिंक, बलात्कार, हिंसा, नकाराचा अधिकार, योनिशुचिता

-------------------------------------------------------------------------

लैंगिक संबंधांना नकार देण्याचा स्त्रीचा अधिकार हा तिच्या स्वतःच्या शरीरावर असणाऱ्या मुलभूत अधिकाराचा भाग आहे, हे वास्तव व्यावसायिक चित्रपटाच्या माध्यमातून जोरकसपणे मांडणाऱ्या 'पिंक' ह्या चित्रपटाच्या निमित्ताने आजच्या आधुनिक स्त्रीच्या विचारपटाचा हा आलेख.

-------------------------------------------------------------------------

शुजित सरकार यांचा 'पिंक' हा अलीकडच्या काळातील एक महत्वाचा चित्रपट आहे. सिनेमा ही केवळ वैचारिक नाही तर भावनिक अनुभूतीही असते. त्यामुळे मला (किंवा इतर कुणाला) या सिनेमाचे (किंवा कोणत्याही कलाकृतीचे) भावणे हे अतिशयोक्त आणि सापेक्ष असू शकते. थेट सामाजिक संदर्भ असलेला एक महत्त्वाचा विषय हाताळल्याबद्दल आणि या विषयातले वैचारिक बारकावे टिपण्याचा पुरेपूर प्रयत्न केल्याबद्दल, तसेच अभिव्यक्तीतील ठाशीवपणा आणि साधेपणा यांसाठी 'पिंक' मला खूप आवडला. मुलगी म्हणून आपल्यावर असलेल्या भावनिक-सामाजिक दडपणाला जिच्यात वाचा फुटते, अशी एक कलाकृती म्हणूनही 'पिंक' पाहताना समाधान वाटते. प्रासंगिक दहशत ही एका सूक्ष्म, अंत:प्रवाही सार्वकालिक मानसिक दहशतीचे प्रतीक म्हणून या चित्रपटात येते. सतत आजूबाजूला, डोळ्यांनी आणि प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष चौकश्यांमधून बाईला विचारले जाणारे प्रश्न कोर्टरूममधले प्रश्न बनून येतात. प्रत्येक स्वातंत्र्यप्रिय अविवाहित बाईकडे बहुसंख्य समाज 'वेश्या' म्हणून बघतो हे अवघड व लाजिरवाणे सत्य पकडण्याचा प्रयत्न हा चित्रपट करतो. समाजातील वर्चस्वशाली विचारप्रवाहाचे पोकळ दुटप्पीपण उघडे पाडणारी ही कलात्मक अभिव्यक्ती मनाला आनंद आणि जगण्याला धाडस देते.

चित्रपटाची कथा साधीच आहे. तीन स्वतंत्र कमावत्या मुली. एका रॉक

कॉन्सर्टमध्ये त्यांना तीन मुले भेटतात, त्यातला एक त्यांना आधीपासून परिचित असतो. त्यांच्यासोबत त्या रात्रीचे जेवण आणि थोडी दारू घेतात. त्यांच्या मोकळ्या वागण्याबोलण्याचा अर्थ या मुली सेक्ससाठी उपलब्ध आहेत असा घेऊन ही मुले त्यांच्यावर शारिरीक बळाचा प्रयोग करू लागतात. त्यातली एक मुलगी तिने 'नाही' म्हटल्यानंतरही तिच्यावर जबरदस्ती करू पाहणाऱ्या एका मुलाच्या डोक्यात स्वसंरक्षणार्थ दारूची बाटली फोडते. त्यानंतर त्या मुलींना अनेकप्रकारे त्रास देण्याचे सत्र सुरू होते. त्याविरुद्ध पोलिसांकडून संरक्षण मिळत नाहीच. उलट, वेश्याव्यवसाय आणि जीवे मारण्याच्या हेतूने हल्ला केल्याचा आरोप ठेवून कोर्टरूममध्ये छळसत्र सुरू ठेवले जाते. कुलीनतेच्या पोकळ संकल्पना आणि त्यांचा आधार घेऊन व्यक्तित्वाच्या निसर्गसुलभ अभिव्यक्तीचा अधिकार मुलीला नाकारणे या समाजाच्या पद्धतीवर 'पिंक'ने प्रकाश टाकला आहे.

स्त्रीची योनिशुचिता समाजाला ढाल म्हणून हवी असते असे वाटते. समाजाने स्वतः निर्माण केलेले सभ्यता आणि नैतिकतेचे मापदंड जेव्हा त्याच्यावर उलटतात, तेव्हा बाईच्या योनिशुचितेमागे भ्रष्ट समाजाला लपता येते. स्वत:च्या शुचिर्भूततेच्या अंधश्रद्धेला तडा जाऊ नये म्हणून घाबराघुबरा समाज नेहमीच आपल्यातल्या एका समाजघटकाला – स्त्रीला लक्ष्य करत असतो. हे केवळ ग्रामीण भारतातच घडते असे नाही, तर ते समाजाच्या सर्व स्तरांबाबत खरे आहे याचे नवल वाटते. शहरीकरणातून घडणारे आधुनिकीकरण सरळ आणि एकमार्गी नाही तर व्यामिश्र आणि उलटसुलट प्रवाहांचे असते. म्हणूनच तथाकथित 'मुक्त' समाजातही स्त्रीची घुसमट वेगळ्या स्वरूपांत शिल्लक राहते. सरंजामशाही व्यवस्थांच्या आंशिक अवशेषांतून सरंजामशाही मानसिकता ह्या भांडवली व्यवस्थेतही वाहत राहते; त्यातून आधुनिकीकरणाची प्रक्रिया अधिकच गुंतागुंतीची बनते. आर्थिक व्यवस्थांच्या आधुनिकीकरणातून भौतिक स्वातंत्र्य उपलब्ध झाले तरी अशा भौतिक बदलांसोबत 'स्त्री'च्या व्याख्येत जे बदल होणे अपेक्षित आहे ते बदल संपूर्ण समाजात घडत नाहीत. सरंजामशाही दृष्टीतून स्त्रीची केलेली व्याख्या केवळ पोकळच नाही तर स्त्रीत्वाविषयी घेतलेल्या विरोधाभासी भूमिकांचे ते मूळ आहे हे 'पिंक'मधून दाखविले आहे. ज्या स्त्रिया

कुलीनतेच्या तथाकथित व्याख्येत बसतात त्या चांगल्या, आणि आपल्या पशुत्वाला खाद्य पुरविण्यासाठी काढण्यासाठी बाकीच्या स्त्रिया उपलब्ध आहेतच, अशी मानसिकता हा 'सभ्य' समाज बाळगतो. आखूड कपडे, उशीरा घराबाहेर राहणे, एकटे राहणे, हसून आणि खुले हातवारे करून बोलणे यावरून स्त्रीचे चारित्र्य ठरवून तिच्याबरोबर कसेही वागण्याचा हक्क प्राप्त होतो असे समजणारा हा समाज आपला असंस्कृतपणा लपवण्याचीही सभ्यता दाखवत नाही, हे क्लेशदायक आहे. हा दुटप्पीपणा समाजात विविध प्रकारे प्रवाही असतो. आंतरजातीय लग्न करणाऱ्या मुलीला जातपंचायत तिच्यावर सामूहिक बलात्कार व्हावा ही शिक्षा देते हे फक्त एक टोक झाले – कुलीनतेचे निकष न पाळणाऱ्या मुलींवर अशा क्रूरतेचा प्रयोग विविध स्वरूपांत केला जात असतो. ही क्रूरता - ज्यामध्ये मानसिक हिंसेचाही समावेश होतो – 'पिंक'मध्ये टिपली आहे. कोर्टरूममध्ये वकिलाने त्या तीन मुलींना विचारलेल्या प्रश्नांमधून हीच हिंसा प्रतीकात्मकरीत्या व्यक्त होते.

'पिंक' मध्ये उल्लेख आलेल्या 'consent debate' ला – शारीरिक संबंधापूर्वी स्त्रीची संमती घेणे आवश्यक आहे की नाही ह्या चर्चेला - भारतात नव्वदीच्या दशकात सुरुवात झाली असे म्हणता येईल. मधुकर नारायण विरुद्ध महाराष्ट्र राज्य या खटल्यात 1990 साली दिलेल्या निर्णयातून सर्वोच्च न्यायालयाने 'हलक्या चारित्र्या'च्या (woman of easy virtue) स्त्रीलाही खाजगी आयुष्याचा, त्यासंदर्भात निर्णय घेण्याचा आणि लैंगिक संबधांना नाही म्हणण्याचा अधिकार आहे ही साहजिक (but obvious) गोष्ट औपचरिकदृष्ट्या प्रस्थापित केली. या केसची 'पिंक'च्या संदर्भाने आठवण होते. याच केसच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाआधी उच्च न्यायलयाने घेतलेली भूमिका आश्चर्यचकित करणारी आहे. जी नवरा सोडून इतरही पुरुषांशी संबंध असल्याचे उघडपणे कबूल करते अशा स्त्रीच्या म्हणण्यावरून एका सरकारी अधिकाऱ्याची नोकरी आणि करिअर धोक्यात आणणे योग्य नाही अशी भूमिका उच्च न्यायालयाने घेतली होती ! आणि ती 'हलक्या चारित्र्या'ची असल्यामुळे तिने सादर केलेल्या पुराव्यांचा गांभीर्याने विचार करता येणार नाही अशी पुस्तीसुद्धा जोडली होती. म्हणूनच एका साहजिक वाटणाऱ्या गोष्टीला सर्वोच्च न्यालयालयाने

आपल्या निर्णयातून उचलून  धरणे ही बाब म्हणूनच महत्वाची ठरते. ह्या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने खाजगी जीवनाचा हक्क (right to privacy) हा  जीविताच्या अधिकाराचा (right to life) भाग असल्याची भूमिका घेतली. बाईच्या (किंवा कुणाच्याही) नकाराचा आणि व्यक्तित्वाचा सन्मान ही निरपेक्ष (absolute) गोष्ट आहे, सापेक्ष नाही अशी ती भूमिका आहे.  पण मुळात ‘हलक्या चारित्र्याची बाई’ अशी काही संकल्पना असावी का हा त्यापुढचा प्रश्न आहे. ते कोणी ठरवावे आणि का?

या देशात स्त्री म्हणून जगताना ‘संवैधानिक नैतिकते’ने आणि त्या अनुषंगाने झालेल्या कायद्यांमुळे मिळालेल्या संरक्षणाबद्दल बऱ्याचदा मनापासून कृतज्ञ वाटत राहते. संवैधानिक नैतिकता मानसिक पातळीवर समाजापासून स्त्रीचे जे संरक्षण करू शकते ते लाखमोलाचे आहे असे मला वाटते. हे संरक्षण संपूर्ण आणि कोणत्याही त्रुटीविना आहे असे नाही. पण समाज hostile बनलेला असताना, एकमेव संविधानाची चौकटच माझ्या असण्याला नैतिक अधिमान्यता देऊन आश्वासित करते. ‘पिंक’मध्ये ही गोष्ट खूप छान टिपली आहे. पैसे घेऊन लैंगिक संबंध प्रस्थापित करण्याची तयारी होती की नव्हती (थोडक्यात, चारित्र्य) हा मुद्दा नाही तर तशी तयारी होती असे गृहीत धरले, तरी ‘नाही’ म्हटल्यानंतर जबरदस्ती करणे हा गुन्हाच आहे ही गोष्ट कायदा मान्य करतो.

बाईच्या सामाजिक-भावनिक कोंडीचे इतर पैलूही ‘पिंक’मध्ये टिपले गेले आहेत. ‘अब्रू’ची संकल्पना स्त्रीला हरप्रकारे पंगुत्व देते, आणि तिचा परिणाम आर्थिक सुरक्षिततेसारख्या मूलभूत गोष्टीवर होत असतो;  समाजाने लावलेल्या लेबलांचे पडसाद तिला स्वत:ला असलेल्या तिच्या ओळखीवर पडत असतात; व्यावहारिक आणि संकल्पनात्मक अशा दोन्ही कारणांमुळे परिस्थितीशी तडजोड करण्याचा मार्ग बाईला अधिक व्यवहार्य वाटतो - हे सर्व आजूबाजूला विविध संदर्भांत सतत घडत असते. जी तो उघडपणे मान्य करणार नाही अशी परिमाणे वापरून आधुनिक समाज मुलींच्या वागण्याचे अर्थ लावत असतो हे वास्तव ‘पिंक’मध्ये टिपले आहे आणि अशा आधुनिकतेला प्रश्न विचारले आहेत. कुलीनतेच्या संकल्पना स्त्रीला व्यक्ती म्हणून वागविण्याच्या आड येतात आणि त्या तिचे व्यक्ती म्हणून असलेले मूलभूतहक्क आणि स्वातंत्र्य नाकारतात. न्यायाचे

तत्त्व स्त्री-पुरुष दोघांना समान लागू होण्यामध्ये कुलीनतेची संकल्पना आड येते. कुलीनतेच्या संकल्पनेतून स्त्रीचे मूल्यमापन केले जाण्याच्या परंपरेतून आपण अजून पुरेसे मुक्त झालेले नाही आहोत हे 'पिंक' दाखवितो. दुसरीकडे, बाई कितीही स्वतंत्र आणि आधुनिक झाली, तरी 'sex object' म्हणून गृहीत धरले जाण्याच्या शक्यतेतून ती मुक्त होत नाही. अशाप्रकारे हिणवले गेल्यानंतर होणारी विचित्र अवस्था 'पिंक'मधील काही संवाद सूक्ष्मपणे टिपतात.

मुलगी म्हणून जगताना 'पिंक'सारखा सिनेमा जगण्याचे बळ देतो म्हणून मला तो आवडला. स्त्रीच्या आयुष्यात शारीरिक हल्ल्याचा खराखुरा धोका कायमस्वरूपी मौजूद असतो आणि दुसऱ्या बाजूला चारित्र्याची तलवार मानेवर कायमस्वरूपी टांगलेली असते. आमचा आत्मसन्मान या दोन्हीपैकी कोणत्याच गोष्टीवर अवलंबून नसला पाहिजे हा 'पिंक'चा एका वाक्यात आशय आणि संदेश आहे. सैद्धान्तिकदृष्ट्या उपलब्ध असलेले उपरोक्त तत्त्व सिनेमासारख्या कलात्मक माध्यमातून बळकट केले जाते. प्रतिमांच्या माध्यमातून ते विचारांच्या पलिकडे जाणिवेच्या पातळीवर बळकट होते. ज्यांच्या विचारांमध्ये ते उपलब्ध नाही त्यांच्या विचारार्थ ते ठेवले जाते. समाजाची मूल्ये काय असावीत या संदर्भात सर्व प्रकारे आणि सर्व स्तरांवर चालू असलेल्या घुसळणीत 'पिंक'सारखी कलाकृती एक भूमिका घेऊन उभी राहते. ती कलात्मकदृष्ट्या दुर्बोध नाही, साधी आणि सरळ आहे हे तिचे वैशिष्ट्यही अधिक भावते. पिंक उपदेशात्मक (prescriptive) झाला असला तरी सिनेमा म्हणूनही ग्रेट आहे. त्याची मांडणी ढिसाळ नाही त्यामुळे सक्षमपणे आशय पोहोचवू शकली आहे. मला या सिनेमातली दोन दृश्ये सर्वांत जास्त आवडली. पहिले हे - केस संपल्यानंतर सगळे गेल्यावर गंभीर मुद्रेचे वकील सेहेगल (अमिताभ बच्चन) कोर्टरूममधून बाहेर येत असताना, कोर्टरूममध्ये ड्यूटीवर असलेली महिला पोलिस कॉन्स्टेबल त्यांचे हात हातात घेऊन अभिनंदन करते, तिच्या डोळ्यात पाणी आहे, चेहऱ्यावर कृतज्ञता आणि कौतुक आहे. स्त्रीला व्यक्ती म्हणून सन्मान देणारे आधुनिकतेचे चर्चाविश्व (discourse) सामान्य माणसांपासून दूर आहे, इंग्रजी बोलणाऱ्यासाठी आहे हे खरे नाही. 'नाही म्हणजे नाही' या विचाराची ताकद सर्वस्पर्शी आहे आणि या विचाराचा विजय कोणत्याही सामान्य बाईसाठी किती मोलाचा आहे हे या

दृश्यातून प्रतीत होते. दुसरा एक अतिसुंदर सीन चित्रपटात येतो – वकील सेहेगल यांची अंथरुणाला खिळलेली बायको या तीन मुलींना थरथरत्या हातांनी एक बिस्किटपुडा देऊ करते आणि मोठ्या अगत्याने 'खा' म्हणते. सगळ्या वैचारिक वादविवादामध्ये नितळ भावनेचा हा शिंतोडा मोठा सुखावणारा वाटतो, त्याचे कलात्मक मूल्य खूप मोठे आहे.

अमिताभ बच्चन आणि प्रमुख भूमिकांतील अभिनेत्रींच्या दर्जेदार अभिनयामुळे सिनेमातील आशयाचे वजन जपले गेले आहे.

स्त्रीची इच्छा नसेल तेव्हा व तिथे लैंगिक संबंधांना 'नाही' म्हणण्याचा अधिकार हा प्रत्येकच स्त्रीसाठी खूप महत्त्वाचा आहे. तिचे भावनिक अस्तित्व त्याच्याशी जोडलेले आहे. या 'नाही'चा आदर करण्याचा संस्कार समाजाच्या सर्वच स्तरांत अजूनही खूपच कमी रुजलेला आहे. स्त्रीवर  लादलेले सर्वच लैंगिक संबंध बलात्कार म्हणून समोर येत नाहीत. 'इंडियन लॉ जर्नल'च्या आकडेवारीनुसार, एकूण बलात्काराच्या घटनांपैकी 25 टक्के बलात्कार हे नवऱ्याने बायकोवर केलेले लैंगिक अत्याचार असतात. भारतात नवऱ्याने त्याच्या बायकोवर केलेला बलात्कार हा कायद्याने गुन्हा नाही. 'नाही'चा आदर करण्याची संस्कृती रुजण्याच्या मार्गात पिंकसारखा सिनेमा एक लहानसे पण महत्त्वाचे योगदान ठरू शकतो.

**ईमेल**: samiksha3knk@gmail.com

***

ऑक्टोबर २०१६ च्या 'आजचा सुधारक' मध्ये प्रकाशित ' युद्ध माझं सुरू'  हा दीपा कदमलिखित अनुभव हा पूर्वी 'दैनिक सकाळ'मध्ये प्रकाशित झाला होता, हे नमूद करण्याचे  नजरचुकीने राहून गेले. क्षमस्व!

# पत्रसंवाद

-------------------------------------------------------------------------

**श.गं.काळे** *(भा.प्र.से. (निवृत्त)),* 414, *शलाका संघ को.ऑप.हौसिंग सोसायटी लि., महर्षि कर्वे रोड, मुंबई* 400 020 *(दूरध्वनी :* 22883507, 22028598*)*

'आजचा सुधारक'च्या जुलै 2016 च्या अंकामध्ये डॉ. रवीन्द्रनाथ टोणगावकर यांच्या आध्यात्मिक साधनेमधील वैज्ञानिक सत्य सांगणाऱ्या लेखाचा उत्तरार्ध आलेला आहे. या लेखात विपश्यना साधनेविषयी जी विधाने केलेली आहेत ती वस्तुस्थितीनुसार दिसत नाहीत. वास्तविक डॉ. टोणगावकर यांनी स्वतःच इगतपुरी येथील दहा दिवसांचे शिबिर पूर्ण केलेले असल्यामुळे त्यांच्या लेखात अशी विधाने यावीत याचे सखेद आश्चर्य वाटते. मी स्वतः इगतपुरी येथे दहा दिवसांची विपश्यना शिबिरे अनेकदा केलेली आहेत. विपश्यनेचा अभ्यास सुरू करतानाच श्री. गोएंका गुरुजी हे स्पष्ट करत असत की त्या साधनेमध्ये स्वतःच्या नैसर्गिक श्वासोच्छ्वासावर लक्ष ठेवावयाचे आहे, 'कोणत्याही प्रकारचा प्राणायाम करावयाचा नाही'. त्यामुळे विपश्यनेमध्ये 'जलद व दीर्घ श्वसन' या बाबींचा समावेश होत नाही. इतर ज्या साधनापद्धती डॉ. टोणगावकर यांनी उल्लेखिल्या आहेत त्यांविषयी मला अनुभव नसल्यामुळे मी त्याबद्दल काहीही लिहू शकत नाही. माझ्याप्रमाणेच माझ्या पत्नीनेही विपश्यनेची शिबिरे तीन/चार वेळा पूर्ण केलेली आहेत. तसेच प्रशासनामध्ये उच्च पदावर असलेल्या अनेक अधिकाऱ्यांनी वारंवार विपश्यना शिबिरे केलेली आहेत. माझ्या या मर्यादित अनुभवामध्ये तर विपश्यनेनंतर कोणी वेडे झाल्याचे मला माहीत नाही. डॉ. टोणगावकर यांना स्वतःला विपश्यनेच्या शिबिरात जो अनुभव आला त्याविषयी मी काही भाष्य करू इच्छित नाही. कारण तो त्यांचा स्वतःचा अनुभव आहे. आपल्या नियतकालिकाला एक विशिष्ट प्रतिष्ठा असल्यामुळे त्यामध्ये आलेल्या लेखावरून अनेकांचा गैरसमज होण्याची शक्यता आहे म्हणून हे पत्र पाठविण्याचा प्रपंच केला आहे. कळावे.

# फेअर अँड लव्हली

*निर्मला गर्ग (अनुवाद: चंद्रकांत पाटील)*

फेअर अँड लव्हलीची वार्षिक विक्री आहे आठ हजार कोटी
कवितेच्या पुस्तकाच्या छापल्या जातात फक्त तीनशे प्रती

फेअर अँड लव्हली = गोरा रंग
गोरा रंग = सुंदर दिसणे
सुंदर दिसणे = स्त्री होणे

स्त्री जी कविता लिहिते
स्त्री जी कविता वाचते
ती या फॉर्म्युल्याच्या बाहेर आहे

कविता
जोडलेल्या असतात एकत्र मुंग्यांसारख्या
समाजाची रचना बदलण्यासाठी
फेअर अँड लव्हली
दाखवत असते अंगठा त्या श्रमाला !

***

(पूर्वप्रसिद्धी : संगिनी – निवडक हिंदी स्त्रीकविता, सं. चंद्रकांत पाटील, मनोविकास प्रकाशन, २०१२)